■ वर्ष- १० ■ अंक- ३२ ■ मुंबई, मंगळवार, २५ जून ते ०१ जुलै २०२४ ■ पृष्ठ-४
मूल्य २/- रुपये
PG 2
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024
# पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA
●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

वेश्या व्यवसायासाठी बांगलादेशातून आणलेल्या अल्पवयीन मुलीची सुटका
3 → ब्रिक्स शिखर परिषदेचा संदेश
गुलाबपाणी : केसांना सतेज करणारा नैसर्गिक उपाय! ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

# वसईमधील हत्येचे गंभीर पडसाद

## भाजप महिला प्रदेश अध्यक्षा चित्रा वाघ यांनी घेतली पोलीस उपायुक्तांची भेट

**नालासोपारा** : वसईत घडलेली घटना अतिशय दुर्दैवी आणि वेदनादायी आहे. खरेतर या घटनेची गंभीर दखल गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. फडणवीस यांनी मीरा-भाईंदरच्या पोलीस आयुक्तांना तात्काळ कारवाईच्या सूचना दिल्या होत्या. नराधमाला अटक करण्यात आली. पुढील कारवाईसाठी सरकारतर्फे चांगला वकील देण्याच्या सूचना देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या आहेत, अशी माहिती भाजप महिला प्रदेश अध्यक्षा चित्रा वाघ यांनी दिली. मंगळवारी वसईत तरुणीची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेचा निषेध त्यांनी यावेळी केला.

मुलीच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहोत. मी स्वतः कारवाईचा पाठपुरावा करण्यासाठी अचोळे पोलीस स्टेशनला भेट दिली. पोलीस उपआयुक्त पौर्णिमा चौगुले, वरिष्ठ पोलीस अधिकारी बाळासाहेब पवार, प्रतिबंधात्मक टीमचे प्रमुख पोलीस निरीक्षक बोरसे यांच्याकडून घटनेबाबत सखोल चर्चा केली. आरोपी तसेच मृत पीडिता ६ वर्षांपासून एकमेकांच्या संपर्कात होते. त्या मुलीच्या आयुष्यात दुसरा तरुण आल्याचा संशय व त्या रागातून ही घटना घडल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे. ८ जून रोजी माझा फोन फोडला. तो भरून देत नाही. वर मला शिवीगाळ करतो, ही तक्रार घेऊन पीडिता अचोळे पोलीस ठाण्यात आली. त्यानुसार तक्रार नोंद करण्यात आली.

आरोपीला दुसऱ्या दिवशी पोलीस ठाण्यात बोलावण्यात आले. त्याला पोलीस दम देत असताना, पीडितेने मी समजावते त्याला असे मधेच म्हणत पोलिसांना रोखले. तरी पोलिसांनी त्याला १४९ ची नोटीस बजावली. पोलीस अधिक तपास करत आहेत. चौकशी करत आहेत, असे चित्रा वाघ यांनी सांगितले. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी म्हणून पोलीस कर्तव्य बजावत आहेत. पण आपणही संवेदनशील आणि सुजाण नागरिकाचे कर्तव्य बजावायला हवे आहे, असे सूचित करत वाघ यांनी वसईतील घटनेचा तीव्र निषेध केला आहे. याप्रसंगी कांचन झा, जिल्हाध्यक्ष महेंद्र पाटील, मनोज पाटील, अपर्णा पाटील, आम्रपाली साळवे, साधना धुरी, सुगंधा खानविलकर, पूनम कुमार, महेश सरवणकर, अभय कक्कड आदी पदाधिकारी उपस्थित होते.



आरतीच्या गुन्हेगाराला फाशीची शिक्षा होईलच, तिला न्याय मिळेल. मात्र समाजात अशा कोणत्याच आरतीचा बळी जायला नको. म्हणून आपणही संवेदनशील आणि दक्ष राहायला हवे, असा सल्लाही वाघ यांनी यावेळी दिला. खरेतर आरती वाचली असती, पण तिला वाचवायला कुणी पुढे आले नाही. बघ्याची भूमिका घेणारे आणि त्याचे व्हिडिओ शूट करणारे बरेच होते. हीदेखील विकृती आहे, असे चित्रा वाघ म्हणाल्या.

# बॅटऱ्या चोरी करून विकणाऱ्या दोघांना अटक



## कल्याण गुन्हे शाखेची कामगिरी

**डोंबिवली** : डोंबिवली शहरात उभ्या केलेल्या वाहनातील बॅटऱ्या चोरून त्याची विक्री करण्यासाठी आलेल्या दोघांना कल्याण गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सापळा लावून अटक केली.त्यांच्याकडून तीन मोठया बॅटऱ्या हस्तगत करण्यात आल्या आहेत .

कल्याण गुन्हे शाखा,युनिट-३ सहा.पोलीस उपनिरीक्षक दत्ताराम भोसले यांना त्यांच्या गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, सुहास उर्फ चिंग्या पाईकराव आणि रॉकी उर्फ मोनू चव्हाण यांनी टेम्पोच्या गाड्यांचे मोठया बॅटऱ्या कोठून तरी चोरून आणल्या आहेत. त्या विक्री करण्यासाठी कल्याण शिळ रोडवरील प्रीमियर कॉलनी मैदानाजवळ दुपारी ३ ते ४ वा. दरम्यान येणार आहेत. खात्रीशीर बातमी मिळाल्याने गुन्हे शाखा युनिट-३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नरेश पवार यांनी ताबडतोब एक पथक रवाना केले.या ठिकाणी गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने सापळा रचला.त्यावेळी सांगितलेल्या वर्णनाप्रमाणे दोन व्यक्ती प्रवासी रिक्षातून उतरले.त्यांच्याकडे दोन गोण्यांमध्ये काही तरी जड वस्तू असल्याचे दिसून आले. ते इकडे तिकडे कावरे बावरे पाहत असताना पोलिसांना तेच संशयित आरोपी असल्याची खात्री झाल्याने त्यांना पळून जाण्याचा मोका न देता घेराव करून जागीच रंगेहाथ पकडले.त्यांची नावे सुहास उर्फ चिंग्या विजय पाईकराव (२१ वर्षे) व रॉकी उर्फमोनू रमेश चव्हाण (१८ वर्षे) दोघेही शेलार नाका डोंबिवली (पूर्व) राहणारे आहेत .त्यांच्याकडील दोन्ही गोण्या उघडून पाहता ॲमरॉन कंपनीच्या दोन बॅटऱ्या, एक्साईड कंपनीची एक बॅटरी अशा एकूण ३ मोठया बॅटऱ्या सापडल्या.या बॅटऱ्यांबाबत विचारले असता त्या विक्री करण्यासाठी आणल्याचे त्यांनी सांगितले. पोलिसांनी त्यांची कसून चौकशी केली असता या मोठया बॅटऱ्या या शेलार नाक्याजवळ डोंबिवली (पूर्व) येथून दोन ॲपे टेम्पो व एक टाटा टेम्पोच्या बॅटऱ्या चोरल्याचे कबूल केले.

# विरारमध्ये जावयाने केली सासूची हत्या



**नालासोपारा** : विरारमध्ये जावयाने सासूची हत्या केल्याची धक्कादायक घटना बुधवारी दुपारी घडली. याप्रकरणी आरोपी जावयाला विरार पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. कौटुंबिक वादातून त्याने हत्या केल्याचे पोलिसांनी सांगितले. विशेष म्हणजे हत्या करून पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या आरोपीच्या मुलांनी त्याला घरात कोंडून ठेवल्याने तो पकडला गेला. विरार पूर्वेकडील साईनाथ नगर परिसरात तीन महिन्यांपासून प्रशांत खैरे हा पत्नी कल्पना, दोन मुले व सासू यांच्यासोबत भाड्याच्या घरात राहत होता. त्याला दारूचे व्यसन असल्याने तो पत्नी व सासू लक्ष्मी खांबे यांना शिवीगाळ करून त्रास देत होता. बुधवारी दुपारी १ च्या सुमारास प्रशांत मद्यपान करून घरी आला होता. त्यावेळी पत्नी कामासाठी मुंबईला गेली होती. त्यावेळी त्याचा सासूबरोबर वाद झाला. याच वादातून प्रशांत खैरेने सासूचे हातपाय बांधून मानेवर व पोटावर धारदार शस्त्राने वार करून तिची हत्या केली. हत्या करून प्रशांत पळून जाण्याच्या तयारीत होता. त्यावेळी घरात असलेल्या मुलांनी दरवाजाला कडी लावून त्याला आत डांबले. आजूबाजूला आरडाओरडा करून नागरिकांना गोळा करून पोलिसांना या घटनेची माहिती दिली.

# लोकसभा निवडणूक कालावधीत सव्वातीन कोटींचा अवैध मद्य साठा जप्त

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई, ७११ गुन्हे दाखल, ४३० जणांना अटक

**ठाणे** : राज्य उत्पादन शुल्क ठाणे विभागाच्या भरारी पथकाने लोकसभा निवडणुकीची १६ मार्चला आचारसंहिता लागल्यापासून १९ मे पर्यंत त्यांच्या क्षेत्रात विविध ठिकाणी कारवाई केली. यात सुमारे सव्वा तीन कोटी रुपयांचे ८ लाख लिटर अवैध मद्य जप्त केले .तर ४३० जणांना अटक करण्यात आली असून एकूण ७११ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून अवैध दारुवर कारवाई करण्यासाठी ठाणे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या ठाणे फ्लाईंग स्कॉर्डने कंबर कसली होती. यात १६ मार्च ते १९ मे या कालावधीत या पथकाने रसायन, हातभट्टीचे देशी मद्य विदेशी मद्य बिअर , वाईन शॅमपेयन, बनावट मद्य ,ताडी, काळा गुळ आदीवर कारवाई करून जप्त केली आहे. यात एकूण ७११ गुन्हे दाखल आहेत.यात एकूण ४३० जणांना अटक झाली असून ३४ वाहने जप्त करण्यात आली आहेत.या कारवाईत ३ कोटी २४ लाख ३ हजार ८२७ रुपयांचा एकूण मुद्देमाल जप्त करण्यात आला .

यात सर्व प्रकारचे एकूण ८ लाख ११ हजार ३६३ लिटर मदय साठा जप्त केला आहे.ठाणे जिल्ह्यात खाडीकिनारी खारफुटीच्या जंगलात अगदी आतमध्ये गावठी दारूच्या हातभट्ट्या लावल्या जातात.तिथे जाण्यासाठी अशा दारू माफियांच्या स्वःताच्या बोटी आहेत. या बोटीतून आता हे माफिया गावठी दारूची ने आण करतात.अनेक वेळा स्थानिक पोलिस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाकडून अशा भट्ट्यावर कारवाई करण्यात आली आहे. खारपुट्टीच्या जंगलात आत खोलवर या दारू भट्ट्या असल्याने बोटीअभावी तिथे पोहचणे पोलिसांना आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना शक्य होत नाही.



◆निवडणुकीच्या काळात अनेकवेळा परराज्यातील मद्य चोरून आणले जाते. यात विशेष करून गोवा, दीव,दमन येथील दारूचा मोठया प्रमाणत समावेश असतो. हे मद्य खाजगी बसेसच्या माध्यमातून चोरून आणले जाते. त्यामुळे गुजरात गोवा आदी राज्यातून येणाऱ्या अशा बसेसवर या फ्लाईंग स्कॉर्डची विशेष नजर होती. महत्वाची बाब म्हणजे अनेकवेळा गावठी आणि हातभट्टीच्या दारूची विक्री करताना विविध मार्ग अवलंबले जातात. यांत दुधाच्या किटलीत वर दूध आणि खाली पिशवीत दारू ठेवून विक्री होते. काहीवेळा लॅपटॉपच्या बॅग मधूनही त्याची ने आण केली जाते.



▌ याचाच फायदा हे दारू माफिया घेतात. कित्येकदा तर जीवावर उधार होवून अशा भट्ट्यावर कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाला कराव्या लागतात.

▌ लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या काळात अवैध मदयसाठा, बनावट मदय, त्याची वाहतूक आणि विक्री. हे प्रकार रोखण्याकरता राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक निलेश सांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली दोन विशेष भरारी पथकाची निर्मिती केली होती. या पथकात एक निरीक्षक,दोन उपनिरीक्षक,चार कॉन्स्टेबल, एक वाहक अशा आठ जणांचा समावेश होता.

# गोरेगावमध्ये मसाज पार्लरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय

**मुंबई** : गोरेगावमध्ये मसाज पार्लरच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायावर मुंबई पोलिसांच्या अंमलबजावणी कक्षाने कारवाई करत चार मुलींची सुटका केली. याप्रकरणी गोरेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून येथे व्यवस्थापक असलेल्या मुकेश ऊर्फ राहुल सहाने (२९) याला अटक केली आहे.

गोरेगाव पश्चिमेकडील मोतीलाल नगरमध्ये असलेल्या रिद्धी आयुर्वेदा वेलनेस सेंटरमध्ये मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या अंमलबजावणी कक्षातील पोलीस निरीक्षक अनिता कदम यांना मिळाली होती. त्यानुसार अंमलबजावणी कक्षाच्या पोलीस पथकाने बुधवारी सायंकाळी गोरेगाव पोलिसांच्या मदतीने येथे एक बनावट ग्राहक पाठवून छापेमारी केली. पोलिसांनी या कारवाईमध्ये चार बळीत मुलींची सुटका करत सहाने याला ताब्यात घेतले. सहाने याच्या चौकशीत या मसाज पार्लरचे चालक राहुल आणि अनिताकुमारी कोरी असल्याचे त्याने सांगितले. पोलिसांनी पीडित मुलींकडे केलेल्या चौकशीत त्यांना येथे महिना सहा हजार रुपये वेतन आणि शरीरसंबंध ठेवल्यानंतर ग्राहकाकडून मिळालेल्या रकमेतील एक हजार रुपये मुलींना देत असल्याचे उघड झाले आहे.

# आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्टच्यावतीने रत्नागिरी येथील कुळये वाडी येथे सोमेश्वर क्रिकेट मंडळ यांच्या सहयोगाने भव्य क्रिकेट स्पर्धा आयोजन






या स्पर्धेचे नियोजन कुळयेवाडी ग्रामविकास संस्थेने केले होते. यासाठी आश्रय ट्रस्टच्यावतीने सर्व संघाला टी शर्ट देण्यात आले. या स्पर्धेत अनेक गावा गावातून खेळाडू उपस्थित होते. स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व खेळाडूंना आश्रय ट्रस्ट च्या शैक्षणिक विभागाने निती आयोग प्रमाणित सर्टिफिकेट देण्यात आले. येणाऱ्या मान्यवरांना आश्रय सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. गावातील मुलांना याचा आनंद मिळावा व मैदानी खेळ प्रत्येकाने खेळले पाहिजेत हि संकल्पना ट्रस्टचे विश्वस्त डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी दिली होती. या सर्व कार्यक्रमांचे नियोजन कुळये वाडी चे अध्यक्ष अनिल कुळये व सर्व कुळये वाडी ग्रामस्थ यांनी केले. त्याचप्रमाणे प्राथमिक शाळा मुसलोंडी या शाळेत आश्रय ट्रस्टच्या वतीने संकणक देण्यात आले. ग्रामीण भागात याची खूप गरज आहे. अजूनही शाळेत संगणक नाहीत यासाठी आश्रय ट्रस्ट अश्या शाळेंना संगणक वाटप करतात.














पोलीस बातमी पत्र
मुंबई
मुंबई, मंगळवार, २५ जून ते ०१ जुलै २०२४


# वेश्याव्यवसायासाठी बांगलादेशातून आणलेल्या अल्पवयीन मुलीची सुटका

## दोन बांगलादेशी महिला अटकेत

**नवी मुंबई** : बांगलादेशातील एका महिलेने आपल्या १५ वर्षीय पुतणीला बांगलादेशातून अवैध मार्गाने नवी मुंबईत आणून तिला वेश्याव्यवसात गुंतवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. नवी मुंबई पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने बनावट ग्राहकाच्या माध्यमातून सापळा रचून या प्रकरणातील पीडित मुलीची सुटका केली आहे. तसेच पीडित मुलीला वेश्याव्यवसायास लावणारी तिची मावशी व बांगलादेशी एजंट महिला या दोघींना पीटा कायदा त्याचप्रमाणे भारतीय पासपोर्ट अधिनियम व विदेशी नागरिक अधिनियमानुसार गुन्हा दाखल करून दोघींना अटक केली आहे.

या प्रकरणात अटक करण्यात आलेली खुशी नाहीद हसन अख्तर ऊर्फ सोना पटेल (२६) व बिथीबेगम मुस्तकीन खान ऊर्फ



बिथीबाबुल गाझी (३१) या दोघी तसेच पीडित अल्पवयीन मुलगी हे सर्वजण बांगलादेशी नागरिक आहेत. आरोपी खुशी ही अल्पवयीन पीडित मुलीची मावशी आहे. गत मार्च महिन्यामध्ये खुशी व तिची सहकारी बिथीबेगम मुस्तकीन खान या दोघींनी पीडित मुलीला मुंबईत काम मिळवून देण्याच्या बहाण्याने बांगलादेशातून अवैध मार्गाने भारतात आणले. त्यानंतर खुशी आणि बिथीबेगम या दोघींनी पीडित मुलीकडून वेश्याव्यवसाय करून घेण्यासाठी त्यांच्या संपर्कात असलेल्या ग्राहकांना अल्पवयीन पीडित मुलीचे फोटो पाठवून दिले. याबाबतची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाली होती.

त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे व त्यांच्या पथकाने बनावट ग्राहकांच्या माध्यमातून या दोन्ही बांगलादेशी महिलांना संपर्क साधून त्यांना शनिवारी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास सीबीडी सेक्टर-१५ मध्ये बोलावून घेतले. त्यानुसार खुशी आणि बिथीबेगम या अल्पवयीन मुलीला वेश्यागमनासाठी घेऊन आल्यानंतर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने त्यांची धरपकड केली. त्यानंतर पोलिसांनी केलेल्या चौकशीत दोन्ही महिला व पीडित मुलगी बांगलादेशी नागरिक असल्याचे व घुसखोरी मार्गाने त्या बांगलादेशातून भारतात आल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी पीडित मुलीची सुटका करून दोन्ही महिलांना अटक केली.

### रील्स बनवण्याच्या बहाण्याने आणले होते भारतात

या कारवाईत सुटका करण्यात आलेल्या अल्पवयीन मुलीला टिकटॉकवर व्हिडीओ बनवण्याची आवड होती. याचाच फायदा उचलत तिची मावशी खुशी हिने व एजंट बिथीबेगम या दोघींनी अल्पवयीन मुलीला मुंबईत टिकटॉक तसेच रील्स बनवल्यास चांगले पैसे मिळत असल्याचे आमिष दाखवले. त्यानंतर गेल्या मार्च महिन्यात या दोन्ही महिलांनी पीडित मुलीला बांगलादेशातून घुसखोरीच्या मार्गाने प्रथम पश्चिम बंगालमध्ये आणले. त्यानंतर या दोघींनी तिला बंगळुरू, गोवा या भागात नेऊन काही दिवसांपूर्वी तिला नवी मुंबईत आणले. त्यानंतर या दोघींनी अल्पवयीन पीडित मुलीसोबत वेश्यागमन करण्यासाठी ४ लाख रुपयांची बोली लावल्याचे तपासात आढळून आले आहे.

# नालासोपाऱ्यात तीन बहिणींवर अत्याचार

## ४ नराधमांना अटक, २० जूनपर्यंत पोलीस कोठडी

**नालासोपारा** : पेल्हार पोलीस ठाणे हद्दीतील तीन सख्ख्या अल्पवयीन बहिणींवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना शनिवारी समोर आली आहे. एक वर्षापासून वेगवेगळे आरोपी त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करत होते. याप्रकरणी एकूण ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. यातील एक आरोपी सराईत गुन्हेगार आहे. वडील व्यसनाधीन असल्याने ३ अल्पवयीन मुलींबाबत ही शोकांतिका घडली.

वडील मुलींच्या आईला मारहाण करत होते, त्यामुळे पत्नी सोडून गेली. मुलींनाही त्यांचे वडील मारहाण करत होते. त्यामुळे गेल्या वर्षी १७ वर्षांची मुलगी घरातून निघून गेली. याच काळात दत्ता क्षीरसागर



(३५) या आरोपीने तिच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन आसरा दिला आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. तिला भेटण्यासाठी तिच्या दोन लहान बहिणी तिच्याकडे येत होत्या. या काळात आरोपी क्षीरसागर याने एका बहिणीवर अत्याचार केला. त्याचे दोन साथीदार निशाद खान (१९) आणि सय्यद अशा दोन व अन्य आरोपींनीदेखील मुलींवर अत्याचार केले. मागील वर्षापासून हा प्रकार सुरू होता. त्यामुळे एक मुलगी गर्भवती राहिली होती. अखेर या प्रकरणाला वाचा फुटल्यानंतर पेल्हार पोलिसांनी तिन्ही मुलींची सुटका केली. याप्रकरणी पोलिसांनी तिन्ही आरोपींना अटक केली आहे. यातील दत्ता क्षीरसागर हा सराईत गुन्हेगार असून, त्याच्यावर राज्यभरातील विविध पोलीस ठाण्यांत सुमारे ४०० गुन्ह्यांची नोंद आहे. आरोपींना वसई न्यायालयात हजर केले असता, त्यांना २० जूनपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे, अशी माहिती पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांनी दिली.

# पत्नीवर हल्ला केल्याप्रकरणी हॉटेलचालकासह पालकांवर गुन्हा

मुंबई : वरळी येथील रहिवासी असलेल्या ४६ वर्षीय हॉटेल व्यावसायिकाविरुद्ध आपल्या वृद्ध आई-वडिलांसह पत्नीवर हल्ला करून तिचा मानसिक छळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केल्याची माहिती पोलिसांनी दिली. पती माझ्या पालकांकडे पैशाची मागणी करतो, असे पीडितेने तक्रारीमध्ये म्हटले आहे. या ४३ वर्षीय महिलेने १३ जून रोजी पती प्रल्हाद अडवाणी, त्याचे वडील सुंदरगुरदास (८५) आणि आई मेनका (७८) यांच्याविरोधात तक्रार दाखल केली होती. पीडितेच्या पतीकडे हॉटेल आणि रिसॉर्ट व्यवसायाचा एक भाग म्हणून गोव्यात लक्झरी बीच रिसॉर्ट आहे, असे पोलिसांनी सांगितले. आरोपी हॉटेलचालकाने आपल्या पत्नीला अनेक वेळा मारहाण केली आणि तिचा मानसिक छळ केला. आरोपी पतीने लग्नाच्या वेळी ५ लाख रुपयांच्या घड्याळाचीही मागणी केली होती आणि त्याची इच्छा महिलेच्या वडिलांनी पूर्ण केली होती. २०१७ मध्ये तक्रारदाराच्या वडिलांनी मनालीतील त्यांची मालमत्ता विकली होती, त्यानंतर अडवाणी आणि त्यांच्या पालकांनी त्यांच्याकडून मिळालेल्या रकमेत हिस्सा मागायला सुरुवात केली. जेव्हा पीडितेने तिच्या वडिलांच्या मालमत्तेतील हिस्सा देण्यास नकार दिला, तेव्हा अडवाणीने तिच्यावर हल्ला केला आणि तिचा शारीरिक आणि मानसिक छळ केला, असे एफआयआरमध्ये म्हटले आहे. तक्रारीत महिलेने तिच्या पतीवर विवाहबाह्य संबंध असल्याचा आरोपही केला आहे.

# समाज माध्यमावर बोलणे बंद केल्याने अश्लील फोटो व्हायरल

## इंडोनेशियातील नागरिकाविरोधात तरुणीची तक्रार

**मुंबई** : स्वभाव पटत नसल्याने बोलणे बंद करणाऱ्या तुर्की देशातील तरुणीचे इंडोनेशियातील मित्राने मॉर्फ केलेले अश्लील फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल केल्याचा प्रकार समोर आला आहे. सध्या मुंबईत राहणाऱ्या या तरुणीने याप्रकरणी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करून ना. म. जोशी मार्ग पोलीस अधिक तपास करीत आहेत.

मूळची तुर्की देशातील असलेली २८ वर्षीय तरुणी एका दूतावास कार्यालयात ऑपरेशन मॅनेजर या पदावर नोकरी करत असून, लोअर परळमध्ये वास्तव्यास आहे. समाज माध्यमावरील भाषा शिकण्याच्या ॲपच्या माध्यमातून तिची इंडोनेशियामधील रहिवासी मोहम्मद इसान मुस्ताफा नावाच्या तरुणाशी ओळख झाली होती. फोन कॉल आणि चॅटिंग करत दोघेही एकमेकांचे चांगले मित्र-मैत्रीण झाले. दोघांनीही एकमेकांना व्हॉटस ॲपवर काही फोटोसुद्धा पाठविले होते. काही दिवसांनी एकमेकांचे विचार जुळेनासे झाले. मुस्ताफा याची वर्तवणूक बदलल्याने तक्रारदार तरुणीने त्याच्याशी बोलणे कमी केले.

मुस्ताफा हा सतत तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न करत होता. मात्र, तक्रारदार तरुणी त्याच्याशी फारशी बोलत नसल्याने मुस्ताफाने तिला तुझी वाट लावून टाकण्याची धमकी दिली होती. तरीसुद्धा तक्रारदार तरुणी बोलत नसल्याने मुस्ताफाने तिला अश्लील संदेश पाठविण्यास सुरुवात केली. मुस्ताफाने फेसबुक, इंन्स्टाग्रामवर वेगवेगळ्या नावाने खाती उघडून तसेच, गुगल मॅप आणि गुगलवर तक्रारदार तरुणीचे मॉर्फ केलेले अश्लील फोटो आणि व्हिडीओ अपलोड केले. तक्रारदार तरुणीने त्याला असे न करण्याची विनंती केली. पण, त्याने हा प्रकार बंद केला नाही. अखेर, तरुणीने ना. म. जोशी मार्ग पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली आहे.


# किरकोळ वादातून तरुणाची हत्या

**मुंबई** : क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादातून दहा जणांच्या सशस्त्र टोळीने तलवारी, कोयते आणि चाकूने प्राणघातक हल्ला करत २९ वर्षांच्या तरुणाची निर्घृणपणे हत्या केल्याची घटना मंगळवारी मध्यरात्री ट्रॉम्बे परिसरात घडली. अक्षय तिकडे असे मृत तरुणाचे नाव असून, या प्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल करत ट्रॉम्बे पोलिसांनी सहा आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. नवी मुंबईतील कौपरखैरणे, सेक्टर ५ मध्ये राहात असलेल्या अक्षयला येथील नियोजित मेट्रो प्रकल्पाला पाणीपुरवठा करण्याचे कंत्राट मिळाले होते. मंगळवारी रात्री काम आटोपून अक्षय हा महाराष्ट्रनगरात त्याच्या मित्रांना भेटण्यासाठी आला होता. मित्रांशी गप्पा मारत असताना १० आरोपींची सशस्त्र टोळी तेथे आली. येथे त्यांच्यात आणि अक्षयमध्ये क्षुल्लक कारणावरून वाद झाला. त्यानंतर या टोळीने अक्षयवर तलवारी, कोयते आणि चाकूने प्राणघातक हल्ला चढवला. डोक्याला, मानेला, पोटावर आणि छातीवर खोलवर वार झाल्याने अक्षय गंभीर जखमी झाला. मित्रांनी तातडीने त्याला उपचारांसाठी जवळच्या रुग्णालयात नेले. मात्र, डॉक्टरांनी त्याला दाखलपूर्व मृत घोषित केले. रुग्णालय प्रशासनाकडून याची माहिती मिळताच ट्रॉम्बे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. पोलिसांनी अक्षयचा भाऊ अमोल याची फिर्याद नोंदवून घेत या प्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला. पोलिसांनी रवींद्र दास, अभिजीत ओव्हाळ, पियूष जाधव ऊर्फ लाल्या, प्रणेश नायडू ऊर्फ सिद्धू, आकाश मांडवकर आणि शशिकांत यादव अशा सहा जणांना अटक केली आहे.

# अभिनेते अनुपम खेर यांच्या कार्यालयात चोरी

**मुंबई** : ज्येष्ठ सिने अभिनेते अनुपम खेर यांच्या अंधेरीतील कार्यालयात चोरी झाल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. अनुपम खेर यांनी स्वतः सोशल मीडियावर चोरीचा व्हिडीओ असलेली एक पोस्ट शेअर करत याबाबत माहिती दिली आहे. त्यानुसार, अज्ञात आरोपींविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करून आंबोली पोलीस आणि गुन्हे शाखा आरोपींचा शोध घेत आहे.

अंधेरीतील वीरा देसाई परिसरात अनुपम खेर यांचे एक कार्यालय आहे. दोन चोरट्यांनी बुधवारी रात्री कार्यालयाचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला. अकाऊंट्स विभागातील तिजोरी त्यांनी तोडण्याचा प्रयत्न केला; पण ते तिजोरी तोडू शकले नाहीत. अखेर ही तिजोरी आणि अनुपम खेर यांच्या कंपनीने निर्मिती केलेल्या एका चित्रपटाची निगेटिव्ह असलेला एक बॉक्स चोरी करून पळ काढला. कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी ही माहिती अनुपम खेर यांना दिली. त्यानंतर त्यांनी



पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.चोरीचा हा घटनाक्रम येथे बसवण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाला आहे. दोन्ही चोर पळून जाताना एका रिक्षात सामान ठेवत असल्याचे दिसत असून त्याआधारे पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत. अनुपम खेर यांच्या कार्यालयातून चोरी झालेल्या तिजोरीत सुमारे ४ लाख १५ हजार रुपयांची रोख रक्कम होती, तर बॉक्समध्ये मैने गांधी को नही मारा चित्रपटाची निगेटिव्ह होती, अशी माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

# विनापरवाना शस्त्र बाळगणारा अटकेत

**डोंबिवली**: गोळवली परिसरात एकजण बेकायदेशीररित्या विनापरवाना पिस्तूल सोबत बाळगून फिरत असल्याबाबतची खात्रीशीर माहिती मानपाडा पोलिसांना मिळाली. गुन्हे प्रकटीकरण पथकाने आरोपी अंकुश राजकुमार केशरवानी (२५ वर्ष) राहणार, दत्तनगर- डोंबिवली (पूर्व) याला सापळा लावून अटक करण्यात आली आहे . त्याच्याकडून एक देशी बनावटीचे पिस्तूल व सहा जिवंत काडतुसे तसेच दोन मोबाईल असा एकुण १ लाख ३८हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. बेकायदेशीर रित्या विनापरवाना पिस्तूल सोबत बाळगल्याप्रकरणी त्याच्या विरुद्ध मानपाडा पोलीस स्टेशन मध्ये शस्त्र अधिनियम कलम ३,२५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या आरोपी विरुद्ध डोंबिवली पोलीस स्टेशन येथे यापूर्वी एक गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल आहे.

# वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखवून फसवणूक

**मुंबई** : मुलाला मुंबईतील वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षणासाठी प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखवून दोघांनी दहिसरमधील एका व्यक्तीकडून सहा लाख रुपये घेत त्यांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी सौरभ कुलकर्णी आणि अमन पाऊणीकर यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून दहिसर पोलीस तपास करत आहेत.

दहिसर पूर्वेकडील न्यू लिंक रोड परिसरात राहात असलेले ५० वर्षीय तक्रारदार हे विमा कंपनीमध्ये विकास अधिकारी पदावर कार्यरत आहेत. त्यांचा मुलगा दीप हा २०२२ साली बारावी पास झाला. पुढील वर्षी तो वैद्यकीय प्रवेशासाठी आवश्यक असणारी नीटची परीक्षासुद्धा पास झाला. मुलाला मुंबईतच वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळावा, म्हणून तक्रारदार हे प्रयत्न करत होते.

तक्रारदार यांच्या पत्नीच्या ऑफिसमध्ये काम करणाऱ्या महिला सहकाऱ्याने सौरभ कुलकर्णी हा मुलांना वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश मिळवून देत असल्याचे सांगितले. पत्नीकडून याबाबत माहिती मिळताच तक्रारदार यांनी गेल्या वर्षी जून महिन्यात सौरभला संपर्क साधून मुलाच्या प्रवेशाबाबत सांगितले. सौरभ याने तो आणि अमन पाऊणीकर दोघे मिळून एस. के. एज्युकेशन कन्सन्टेन्सी नावाने व्यवसाय करत असल्याचे सांगितले. सौरभने तक्रारदार यांच्याकडे मुलाच्या गुणपत्रिकेची मागणी करत प्रवेशासाठी पाच ते सहा लाख रुपये खर्च येईल, असे सांगितले. तसेच त्याने पैसे घेतल्याचा करार करून देत मुलाला प्रवेश न मिळाल्यास पैसे परत देण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे मुलाच्या भविष्याचा विचार करत तक्रारदार यांनी सौरभवर विश्वास ठेवत त्याला आणि अमनला सहा लाख रुपये पोच केले. मात्र दीपला वैद्यकीय प्रवेश मिळाला नाही. सप्टेंबर अखेर सौरभ व अमन यांना फोन करून दीपचा मुंबईतील वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश होत नाही. त्यामुळे राज्यातील अन्य वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेशासाठी प्रयत्न करतो, असे सौरभने तक्रारदार यांना सांगितले. त्यानंतर मात्र आपली फसवणूक झाल्याची तक्रारदार यांची खात्री पटली. अखेर त्यांनी सौरभ आणि अमनला दिलेले पैसे परत मागितले. सौरभने त्यांना २ लाख २० हजार रुपये परत केले; पण वारंवार मागणी करूनही उरलेले ३ लाख ८० हजार परत न मिळाल्याने अखेर तक्रारदार यांनी दहिसर पोलीस ठाणे गाठून सौरभ आणि अमन यांच्याविरोधात आर्थिक फसवणुकीची तक्रार दिली आहे.

# गुजरातमधील व्यापाऱ्याकडून ८९ लाखांचे हिरे घेऊन हिरे दलाल पसार

**मुंबई** : गुजरातमधील एका हिरे व्यापाऱ्याकडून ८९ लाख रुपये किमतीचे हिरे घेऊन एका हिरे दलालाने पळ काढल्याचा प्रकार वांद्रे-कुर्ला संकुलातील (बीकेसी) भारत डायमंड बोर्समध्ये उघडकीस आला आहे. मित शाह असे आरोपीचे नाव असून बीकेसी पोलिसांनी त्याच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

सुरतमधील रहिवासी असलेल्या ३६ वर्षीय हिरे व्यावसायिकाचा हिरे खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. त्यांच्या कंपनीचे एक कार्यालय बीकेसीमधील भारत डायमंड बोर्समध्ये आहे. सुरतमधील एका हिरे दलालाने त्याचा चुलतभाऊ मित शाह हा मुंबईतील भारत डायमंड बोर्स येथे ब्रोकर म्हणून हिरे खरेदी-विक्रीचे काम करत असल्याचे सांगितले. मित शाह याने २४ जानेवारीला तक्रारदार यांची कार्यालयात येऊन भेट घेत त्यांच्याकडील एका कंपनीला हिऱ्यांची आवश्यकता असल्याचे सांगितले. त्याने तक्रारदार यांच्याकडून ८९ लाख ६१ हजार २१० रुपये किमतीचे १३६.५९ कॅरेटचे हिरे घेतले. दोन दिवसांत व्यवहार पूर्ण करून पैसे देण्याचे आश्वासन देऊन गेलेला मित परतलाच नाही. मित शाह याने अशाप्रकारे भारत डायमंड बोर्समधील अन्य व्यापाऱ्यांकडून हिरे घेऊन मोबाईल बंद करत पळ काढल्याचे तक्रारदार यांना समजले. अखेर आपली फसवणूक झाल्याची खात्री पटल्याने तक्रारदार यांनी बीकेसी पोलीस ठाणे गाठून मित शाहविरोधात ८९ लाख ६१ हजार रुपये किमतीच्या हिऱ्यांच्या फसवणुकीची तक्रार दिली आहे.

# क्षुल्लक कारणावरून मित्राला मारहाण

**ठाणे** : अंगावर धावून आल्यानंतर कानशिलात वाजवल्याचा राग मनात धरून मित्र अशय विश्वकर्मा याने केशव अनंत शेटये याला लाथाबुक्क्याने मारहाण केली.शेटये याने बुधवारी नौपाडा पोलिस ठाण्यात विश्वकर्मा याच्या विरोधात गुन्हा दाखल केला. केशव अनंत शेटये याने त्याचा मित्र अशय विश्वकर्मा याला भेटण्यासाठी बोलावले. एस.टी. वर्कशॉप जवळील सार्वजनिक रोडवर, खोपट, ठाणे येथे भेट झाली. त्यावेळी विश्वकर्मा याने केशवला शिवीगाळ करत अंगावर धावून गेला. केशवने अशय याच्या कानशिलात वाजवली. याचा राग आल्यानंतर अशय याने केशवची दुचाकी दगडाने ठेचू लागला आणि विरोध केला तर दगडाने केशव याला जखमी केले.याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीतील नफ्याच्या आमिषाने फसवणूक

## वाढत्या गुन्ह्यांना आळा घालण्याचे पोलिसांसमोर आव्हान

**नवी मुंबई** : शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवून चांगला नफा कमवता येतो, हे आपल्याला माहिती आहे. परंतु, याचे ज्या लोकांना ज्ञान नाही, अशा लोकांना जास्त परताव्याचे आमिष दाखवून त्यांच्याकडून लाखो रुपयांची ऑनलाइन गुंतवणूक करून घ्यायची. त्यानंतर चलाखी करत त्यांची संपूर्ण रक्कम हडप करण्याच्या प्रकारांत सध्या अनेक नागरिक अडकत आहेत. तसेच लाखो नव्हे, तर कोट्यवधी रुपये गमावत आहेत. नवी मुंबईत अशा घटनांत दिवसेंदिवस वाढ होऊ लागली आहे. नवी मुंबईत गत ६ महिन्यांमध्ये घडलेल्या अशा प्रकारच्या ४० पेक्षा अधिक गुन्ह्यांमध्ये ३० कोटींहून अधिकची रक्कम सायबर गुन्हेगारांनी हडप केल्याचे उघडकीस आले आहे.

नागरिकांना लुबाडण्यासाठी सायबर गुन्हेगार नवनवीन शक्कल लढवत असतात. यातलाच एक प्रकार म्हणजे शेअर मार्केट ट्रेडिंग. शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवणाऱ्या जाहिराती हे सायबर गुन्हेगार समाज माध्यमांतून पसरवतात. या जाहिरातीला भुलून एखाद्याने जाहिरातीत दिलेल्या नंबरवर संपर्क साधल्यास अथवा लिंकवर क्लिक केल्यास ती व्यक्ती थेट सायबर गुन्हेगारांनी फसवणूक करण्यासाठी तयार केलेल्या व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये जोडली जाते. त्यानंतर त्या ग्रुपमधील इतर सहभागी सदस्य चॅटिंगद्वारे त्यांना शेअर मार्केट ट्रेडिंगमुळे चांगला नफा मिळाल्याच्या भूलथापा मारून, त्यांच्या जाळ्यात अडकलेल्या व्यक्तीला गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करतात.



### ११ कोटी गोठवले

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत गेल्या सहा महिन्यांमध्ये घडलेल्या ऑनलाइन फसवणुकीच्या गुन्ह्यांत सायबर गुन्हेगारांनी ४० पेक्षा अधिक गुन्ह्यांमध्ये ३० कोटींहून अधिकची रक्कम हडप केली आहे. ऑनलाइन फसवणूक झालेल्या तक्रारदारांनी वेळीच सायबर पोलिसांकडे धाव घेतल्याने सायबर पोलिसांनी १५ गुन्हे उघडकीस आणून फसवणूक झालेल्या नागरिकांची सुमारे ११ कोटींची रक्कम गोठवली तसेच या गुन्ह्यात सहभागी असलेल्या १८ जणांना अटक केली.

> “ नागरिकांनी ऑनलाइन गुंतवणुकीच्या नफ्याच्या आमिषाला बळी पडू नये तसेच कोणत्याही अज्ञात लिंकला प्रतिसाद देऊ नये. आर्थिक व्यवहार, गुंतवणूक करताना खात्री करूनच व्यवहार करावेत. नागरिकांची ऑनलाइन फसवणूक झाल्यास नागरिकांनी १९३० या टोल फ्री नंबरवर संपर्क साधावा, अथवा cybercrime.gov.in वर तक्रार दाखल करावी.
> – **गजानन कदम,** वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस ठाणे

व्हॉट्सॲप ग्रुपमधील सदस्यांच्या चॅटिंगवर विश्वास ठेवून ही व्यक्ती सुरुवातीला हजारच्या पटीत गुंतवणूक करण्यास सुरुवात करते. यादरम्यान गुंतवणूक केलेल्या रकमेत अधिकचा लाभ झाल्याचे सायबर गुन्हेगार खोट्या ॲपद्वारे दाखवून, त्यांना आणखी रक्कम गुंतवणूक करण्यास भाग पाडतात. यादरम्यान गुंतवणूकदाराला काही रक्कम देऊन त्यांचा विश्वास संपादन केला जातो. त्यानंतर सायबर गुन्हेगारांकडून गुंतवणुकीच्या बहाण्याने त्यांच्याकडून वेगवेगळ्या बँक खात्यांत लाखोंच्या पटीत रक्कम घेतली जाते. तसेच त्यांना गुंतवलेल्या रकमेत कोट्यवधीचा लाभ झाल्याचेदेखील भासवले जाते. त्यामुळे काही व्यक्ती कर्ज काढून, घरदार, दागदागिने विकून सायबर गुन्हेगार सांगतील त्या बँक खात्यात पैसे पाठवण्यास तयार होतात.

जर या व्यक्तीने त्यातील रक्कम काढण्याचा प्रयत्न केला तर वेगवेगळी कारणे सांगून त्याला पैसे काढण्यापासून रोखले जाते. त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येईपर्यंत वेळ निघून गेलेली असते. सायबर चोरटे त्याची कोट्यवधीची रक्कम हडप करून आपले मोबाईल नंबर बंद करून पसार झालेले असतात. अशी फसवणुकीची पद्धत सध्या सर्वत्र सुरू आहे. कमी वेळेत जास्त पैसे कमावण्याच्या नादात तसेच सायबर गुन्हेगारांकडून दाखवण्यात आलेल्या आमिषाला बळी पडून अनेक नागरिक फसत आहेत. नागरिकांमध्ये ऑनलाइन गुंतवणुकीसंदर्भात असलेले अज्ञान सायबर गुन्हेगारांच्या पथ्यावर पडत असून या फसवणुकीच्या प्रकाराला सर्वाधिक उच्चशिक्षित नागरिकही बळी पडत असल्याचे दिसून येत आहे.

सायबर गुन्हेगार ऑनलाइन फसवणुकीसाठी फेसबुक, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांसारख्या समाज माध्यमांवरून फसव्या जाहिराती पसरवून त्याद्वारे आपले सावज हेरतात. एखादी व्यक्ती गळाला लागताच त्यांना व्हॉट्सॲप किंवा टेलिग्राम ग्रुपमध्ये सहभागी करून तसेच त्यांना इतरांचा नफा दाखवून नफ्याचे आमिष दाखवले जाते.

# संपादकीय

## स्वप्न, संकल्प, साधना!



संपादक दिपक मोरेश्वर नाईक

स्वप्ने आणि संकल्प यांची योग्य सांगड साधली तर नव्या निर्मितीचा आविष्कार सहजसाध्य होतो असे म्हणतात. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या सत्ताकाळाचे तिसरे पर्व सुरू होण्याआधी दुसऱ्या पर्वाच्या अखेरच्या काळात आणि १८ व्या लोकसभा निवडणुकांच्या प्रचारकाळात नरेंद्र मोदी यांनी आपल्या संकल्पांचा पुनरुच्चार करताना जनतेच्या मनातील स्वप्नांना वारंवार उजाळा दिला होता. जनतेची स्वप्ने पूर्ण करणे हाच आपला संकल्प आहे, असे त्यांनी सातत्याने सांगितले आणि नव्या सत्तापर्वात प्राधान्याने करावयाच्या कामांचा संकल्पदेखील जाहीर केला. या संकल्पांचे जनतेच्या मनातील स्वप्नांशी नेमके काय नाते आहे, याचा पडताळा घ्यायचा असेल, तर थोडे मागे जाऊन इतिहासात डोकावणे इष्ट ठरते. कारण काही स्वप्नांची पेरणी जनतेच्या केवळ एकाच पिढीच्या मनात नव्हे, तर पुढच्या पिढ्यांनाही पुरेल एवढ्या प्रबळपणे इतिहासानेच करून ठेवली आहे. त्याच इतिहासाचा एक धागा खादी नावाच्या एका ऐतिहासिक नावाशी जोडला गेलेला आहे. खादी नावाच्या या वस्त्राचा नव्या भारताच्या निर्मितीच्या संकल्पाशी जोडला गेलेला हा धागा बळकट करणे हा आता मोदी सरकारचा नवा संकल्प असावा असे दिसते. मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पपूर्तीमध्ये, देशाच्या कानाकोपऱ्यातील प्रत्येक गावात खादी ग्रामस्वराज्य अभियान मजबूत करण्याचा कार्यक्रम आखण्यात आला आहे. भारताचा राष्ट्रीय वारसा असलेले आणि स्थानिक पातळीवर प्राधान्याने वापरले जाणारे हे ऐतिहासिक वस्त्र २०४७ पर्यंत, म्हणजे स्वातंत्र्याच्या शतक महोत्सवी वर्षापर्यंत जागतिक पातळीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प सरकारने सोडल्याने, खादीला जागतिक प्रतिष्ठा प्राप्त होण्याचे दिवस आता दूर राहिलेले नाहीत. नव्या भारताची नवी खादी नव्या उंचीवर नेण्यासाठी देशाची सिद्धता झाल्याचा उच्चार आठवडाभरापूर्वी मुंबईत झालेल्या एका परिषदेत खादी आयोगाच्या अध्यक्षांनी केला आणि स्वप्नपूर्तीच्या संकल्पाचे पहिले पाऊल मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात पडले. खादी हे केवळ सुती वस्त्र नाही, तर ग्रामीण कारागीरांच्या अर्थसंपन्नतेचे आणि रोजगार हमीचे हमखास साधन आहे, यावर शिक्कामोर्तब होण्याचा मुहूर्त आता जवळ आल्याची चिन्हे स्पष्ट झाल्याने, स्वातंत्र्यकाळात सोडल्या गेलेल्या एका समाजिक संस्कृतीच्या आणि परंपरेच्या पुनरुज्जीवनाचे नवे पर्वदेखील सुरू होण्याची सुचिन्हे दिसू लागली आहेत. देशाच्या कानाकोपऱ्यातील, तळागाळातील, दुर्गम भागातील लोकांशी खादीच्या रूपाने जोडला गेलेला एकोप्याचा धागा अधिक मजबूत करणारी नवी संस्कृती आता पुन्हा रुजू लागेल, अशी अपेक्षा करावयास हरकत नाही.

इतिहासाची पुनरावृत्ती होत असते असे म्हणतात. संकल्प दृढ असतील, तर स्वप्नेदेखील साकार होतात असेही मानले जाते. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्याच्या चळवळीत या खादीला अनन्यसाधारण महत्व होते. स्वदेशी चळवळ या नावाने देशाच्या स्वातंत्रलढ्याच्या इतिहासात अजरामर झालेल्या एका आंदोलनाची मुळे खादी या सुती धाग्याच्या वस्त्रानेच विणली गेली होती. स्वातंत्र्य संग्राम आणि खादी यांचे हे ऐतिहासिक नाते आता पुन्हा व्यावसायिकरीत्या अधिक घट्ट होत असल्याचे संकेत आता मिळू लागले आहेत, ही समाधानाची बाब म्हणावी लागेल. हाताने सूत काढणे आणि त्यापासून कापड विणणे हा भारताच्या ग्रामीण भागातील परंपरागत व्यवसाय देशाला एका धाग्याने जोडणाऱ्या संस्कृतीचा एक भाग आहे हे महात्मा गांधी यांनी ओळखले आणि स्वदेशी चळवळीत खादीला स्थान प्राप्त झाले. १९०८ मध्ये गांधीजींनी चरखा संघाच्या माध्यमातून महत्वाच्या स्थानी आणलेली आजची खादी नव्या युगाच्या फॅशनच्या दुनियेतही अग्रेसर स्थानावर विराजमान झालेली आहे. माझ्या हातून जाणते-अजाणतेपणाबद्दल झालेल्या चुकांबद्दल लोक मला दूषणे देतील, पण मी चरख्याच्या पुनरुज्जीवनाचा प्रयत्न केल्याबद्दल मात्र तेच लोक मला दुवादेखील देतील, असे महात्मा गांधी यांनी १९२१ मध्ये यंग इंडियाच्या एका अंकातील लेखात नमूद केले होते. या चरख्याच्या चक्राच्या प्रत्येक फेरीतून समाजाला शांतता, सद्भाव व प्रेम मिळेल, असा विश्वासही गांधीजींनी व्यक्त केला होता. नव्या सरकारच्या नव्या संकल्पातून निर्माण झालेल्या नव्या आशेमुळे गांधीजींनी भूतकाळात व्यक्त केलेला आशावाद नव्या भारतातील संकल्पांचा पाया ठरला आहे.

केवळ महात्मा गांधींच्या द्रष्टेपणामुळेच खादी हे वस्त्र आज देशाच्या नव्या पिढीपर्यंत प्रतिष्ठेचे चिन्ह म्हणून पोहोचले असे नाही. भारतात प्राचीन काळापासून वस्त्र संस्कृतीमध्ये खादीचे स्थान अनन्यसाधारण असेच होते. सम्राट अशोकाच्या काळापासून खादीची वस्त्रे विणण्याचा पारंपरिक व्यवसाय देशात चालत असल्याचे उल्लेख काही संशोधनपर लेखनांत सापडतात. त्याही अगोदर, पुराणकाळातही खादीच्या वस्त्रांचे उल्लेख असल्याचेही काही संशोधकांचे मत आहे. आता तर खादी ही पेहराव संस्कृती ठरू पाहात आहे. संकल्प आणि स्वप्ने यांची गुंफण करण्याच्या सरकारी प्रयत्नांस बळ मिळावे आणि खादी संस्कृतीची परंपरा पुढच्या पिढ्यांपर्यंत प्रतिष्ठापूर्वक जोपासली जावी यासाठी काही वर्षांपूर्वी सरकारी स्तरावर एक संकेत अधोरेखित करण्यात आला होता. सुमारे आठ वर्षांपूर्वी, २०१६ मधील जून महिन्याच्या याच आठवड्यात महाराष्ट्र सरकारने एक आदेश जारी केला होता. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी आठवड्यातून एक दिवस खादीचे कपडे परिधान करावेत असे या आदेशात नमूद होते. त्या संस्कृतीची मुळे राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांत रुजली किंवा नाही, याचा आढावाही या निमित्ताने घेतला जावा. कारण, नव्या संकल्पात खादीच्या जागतिकीकरणाच्या स्वप्नपूर्तीची महत्वाकांक्षा दडलेली आहे.

## सावित्रीचा वटवृक्ष

ज्येष्ठ महिन्यात येणारी पौर्णिमा हा दिवस असतो वटपौर्णिमेचा. पतीला उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभावं म्हणून हे व्रत करतात. वडाच्या झाडाची पूजा करतात. निसर्गपूजेचे विविध प्रकार आपल्या समाजात आहेत. वृक्षतोड होऊ नये म्हणून अनेक वृक्ष 'देववृक्ष' म्हणून पूजले जातात. वृक्षसंवर्धनाला धार्मिक संदर्भ असल्यानं 'देवराई' हा प्रकार अनेक प्रदेशांत असून त्या निमित्तानं वृक्षराजी अजून टिकली आहे. सावित्रीचं आदर्श व्यक्तिमत्त्व आणि पावित्र्य हे सर्वांना ठाऊकच आहे. माता, पिता आणि गुरू यांच्या विरोधाविरुद्ध तिनं सत्यवानाशी विवाह केला. तो अल्पायुषी असूनही त्याचा स्वीकार केला. त्याचे प्राण वाचवणं शक्य नव्हतं; पण ही जादू एका स्त्रीनं आपल्या बुद्धीच्या बळावर करून साक्षात काळाला नमवलं. दीर्घायुषी वृक्षांमध्ये 'वट' हा सर्वश्रेष्ठ आहे. प्राचीन काळात आणि अर्वाचीन काळात 'सासुरवास' नावाचा नरकवास होता! त्यातून सुटका होण्यासाठी व्रत, सण आणि उत्सवांचा फार उपयोग व्हायचा. सारे सण महिलांसाठी! तेही निर्सगपूजेचे. वडाच्या पूजेनिमित्त साजशृंगार करणं, भरजरी कपडे वापरणं, नटूनथटून देवदर्शनाला जाणं, नदीवर निवांत बसणं, सर्व सुवासिनी एकमेकींना भेटून सुखदुःखं सांगणं, घरातल्या कटकटी बाहेर न सांगणं... वगैरे. या साऱ्यांतून एक विरंगुळा म्हणून अनेक उत्सवात भाग घेणं. इतर वेळी काय? कळकट अवतारात रांधा वाढा, उष्टी काढा! सावित्री ही जशी आदर्श पतिव्रता, तशीच प्रज्ञा आणि प्रतिभेची मूलभूत मूर्ती आहे. तिची पुराणकथा सर्वश्रुत आहे, पण संगणक युगात तिच्या शौर्याचा, धैर्याचा, चातुर्याचा अर्थ नव्यानं शोधायला हवा. पतीला अकाली मृत्यू येऊ नये म्हणून व्यसनांपासून दूर ठेवणं, दुर्गुणांपासून मुक्त करणं. त्याचा हप्ता, मलिदा नको म्हणून आहे त्या पगारात भागवणं, 'काळा पैसा' हा शिव्याशापांचा असतो, त्याचे दुष्परिणाम रोज ऐकायला, बघायला अन् वाचायला मिळतातच. पतीला यमपाशातून सोडवणं म्हणजे त्याला 'वळण' लावणं. सद्गुणांवर विजय मिळवून सन्मार्ग दाखवणं, त्याचे नालायक, फुकटे, कंजूष, मतलबी आणि व्यसनी मित्र कायमचे तोडून टाकणं. त्याची स्तुती करून, वादविवाद टाळणं अशा अनेक गोष्टी करताना स्वतःचं पैशांचं, खरेदीचं वेड कमी करणं. उठसूठ माहेरी न जाणं. सकाळी उठल्याबरोबर आईला फोन न करणं, तासन्तास टीव्हीवरील 'आगलावू' कार्यक्रम न पाहणं, सद्ग्रंथवाचन करणं... हे करताना जीवनावर अतूट श्रद्धा ठेवणं हीच (किंवा हीसुद्धा) वटपूजा आहे!

प्रत्येकाच्या आयुष्याची लांबी ठरलेली आहे, पण उंची वाढवणं आपल्या हाती आहे. आजारपण, उपेक्षा, अपमान आणि अपयश हे आपल्याच नशिबात का? असा निराश विचार सोडून नित्य, नवा दिवस उत्साहाचा, आनंदाचा व्हावा म्हणून वटवृक्षाचा आदर्श समोर ठेवावा आणि घराण्याच्या पारंब्या सांभाळाव्यात!

# ब्रिक्स शिखर परिषदेचा संदेश

ब्रिक्स परिषदेत विविध देशांच्या विदेश मंत्र्यानी जगातील विविध राष्ट्रांमध्ये सामंजस्य व सद्भाव वाढीसाठी केलेले सहकार्य महत्त्वाचे आहे. या व्यासपीठातून शांतता व सहिष्णुतेसाठी संप्रेषण वाढविण्यावर भर देण्यात आला आणि त्यामुळे मजबूत सहकार्यासाठी एक नवी चौकट विकसित करण्यात आली आहे.

बहुध्रुवी जगात बहुमुखी नेतृत्व सर्वांनी स्वीकारले पाहिजे, कारण आता अमेरिका व रशियाभोवती किंवा भांडवलशाली किंवा साम्यवादाभोवती फेर धरून नृत्य करण्याचे दिवस संपले आहेत. ब्रिक्स विकास बँकेची स्थापना करून विकसनशील देशांना अकस्मात सहाय्य करण्याची योजना आखण्यात आली आहे. नुकतीच रशियात विदेश मंत्रीस्तरीय ब्रिक्स शिखर परिषद संपन्न झाली. या परिषदेमध्ये ब्रिक्स या संघटनेचा विचारपूर्वक विस्तार करण्यात आला आणि नवीन सदस्यांना ब्रिक्सने आपल्या कवेत घेतले. आता ही संघटना पश्चिम आशियातील देशांमध्ये अधिक मजबूत झाली आहे. भारताने या सर्व नवीन सदस्यांचे मनःपूर्वक स्वागत केले आहे आणि त्यांची सदस्यता दीर्घकाळ शांतता व सुरक्षिततेसाठी फलदायी ठरेल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. पाकिस्तानला प्रतिशह देण्याच्या दृष्टीने भारताने टाकलेले हे एक मोठे धाडसी पाऊल आहे असे म्हणावे लागेल. ब्रिक्समध्ये दाखल झालेल्या नव्या सदस्य राष्ट्रांमध्ये प्रामुख्याने इजिप्त, इथिओपिया, इराण, सौदी अरेबिया तसेच संयुक्त अरब अमिरात या देशांमध्ये आता ब्रिक्सचे प्रस्थ वाढले असून या देशांत या संघटनेने आपला पाया अधिक भक्कम केला आहे.

२०२३ मध्ये झालेल्या ब्रिक्स परिषदेनंतर झालेली ही मंत्रिस्तरीय शिखर परिषद महत्त्वाची होती. रशियातील निझनी नोव्हगोरोड येथे ही परिषद संपन्न झाली. ब्रिक्स परराष्ट्र मंत्र्यांनी जगातील प्रश्नाबाबत आणि ब्रिक्स सदस्य राष्ट्रांच्या विकास योजनांबद्दल या परिषदेमध्ये सर्वांगीण दृष्टीने ऊहापोह केला.

रशियात झालेल्या ब्रिक्स शिखर परिषदेत सर्व सदस्य राष्ट्रांनी काही महत्त्वपूर्ण बिंदूंवर मौलिक चर्चा केली. या परिषदेनंतर प्रकाशित करण्यात आलेले संयुक्त निवेदनपत्र हे दस्तऐवज म्हणून महत्त्वाचे आहे. त्यामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, उपस्थित राष्ट्रांनी प्रामुख्याने जगातील युद्ध व तणावाच्या प्रश्नावर शांततापूर्ण तोडगा काढण्याचे आवाहन केले आहे. रशियात झालेल्या ब्रिक्स शिखर परिषदेत भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व ज्येष्ठ प्रशासकीय मुत्सद्दी दम्मू रवी यांनी समर्थपणे केले.

जगातील बदलते राजकारण आणि ताणतणाव, युद्ध या पार्श्वभूमीवर सुरक्षेचे महत्त्व या परिषदेत मांडण्यात आले. जगाच्या अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने, बिघडलेली पुरवठा साखळी तसेच आर्थिक सहकार्याची गरज, सांस्कृतिक आदान-प्रदान, लोकालोकांमधील संपर्क व देवाणघेवाण या विषयांवरही चर्चा करण्यात आली. प्रामुख्याने सुरक्षा, आर्थिक सहकार्य आणि लोकसंपर्क या तीन स्तंभांवर ही चर्चा आधारित होती. धोरणात्मक भागीदारीबाबत ब्रिक्स संघटनेची एक वैशिष्ट्यपूर्ण चौकट आहे आणि या चौकटीत राहून हे सदस्य एकमेकांना सहकार्याची हमी देतात. तसेच संयुक्त राष्ट्रसंघाच्या ध्येय उद्दिष्टावरही त्यांचा विश्वास आहे, त्यामुळे जागतिक शांतता व सहकार्य मजबूत करण्यासाठी या संघटनेचे सत्ता समतोलात एक वेगळे महत्त्व आहे. शांतता व सुरक्षेबाबत आपल्या वचनबद्धतेची पुष्टी या निवेदनात करण्यात आली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या चार्टरमध्ये अंतर्भूत केलेल्या उद्दिष्टांवरील श्रद्धा आणि विश्वास हे या संघटनेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होय.

वर्तमान बहुध्रुवी जगात ब्रिक्स हे ब्राझिल, रशिया, चीन व भारत तसेच दक्षिण आफ्रिका या देशांचे प्रभावी संघटन आहे. जगातील ३० टक्के भूभाग आणि ४५ टक्के लोकसंख्येचे प्रतिनिधित्व ही संघटना करते. आंतरराष्ट्रीय कायद्याने प्रस्थापित करण्यात आलेल्या तत्त्व व उद्दिष्टांचे समर्थन करताना




ही संघटना काही उच्च ध्येयवादाची जोपासना करते आणि त्या आधारे आपल्या वचनबद्धतेला सावधपणे सामोरे जाते. या सर्व तत्त्वांचा पुनरुच्चार ब्रिक्स शिखर परिषदेतील निवेदनात करण्यात आला आहे. परस्परांच्या सार्वभौमत्वाचा आणि स्वयं निर्णयाच्या हक्कांचा आदर करण्यातसुद्धा ही सदस्य राष्ट्र एकमेकांच्या सहकार्याबाबत बांधील आहेत. आंतरराष्ट्रीय प्रणालीमध्ये संयुक्त राष्ट्राची केंद्रीय भूमिका आणि आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा कायम राखण्यासाठी ही राष्ट्रे परस्परांवर विश्वास व्यक्त करीत आहेत. विशेषतः शाश्वत विकासाची लक्ष्ये गाठणे, सर्वांची प्रगती, लोकशाही आणि मानवी हक्क, सर्वांसाठी मूलभूत स्वातत्र्यांचे जतन आणि संवर्धन तसेच परस्परांचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी ब्रिक्स संघटना वचनबद्ध आहे. या संघटनेच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या विकास बँकेचे कार्यही प्रगतिपथावर आहे. सर्वांना अधिकाधिक लोकशाही वातावरण मिळावे, प्रातिनिधिक प्रभावी आणि कार्यक्षम अशी व्यवस्था बनविण्याच्या उद्देशाने ब्रिक्स सदस्य राष्ट्रांनी सुरक्षा परिषदेतील संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसमावेशक सुरक्षा प्रयत्नांना पाठिंबा देण्याचे निश्चित केले आहे. २००९ पासून ब्रिक्स विदेश मंत्र्यांनी आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्यासाठी एक मंच म्हणून कार्याला सुरुवात केली आहे. जी-२० सारख्या महत्त्वाच्या शिखर परिषदेतील भूमिकेससुद्धा त्यांनी दुजोरा दिला, हे भारताचे एक मोठे यश होय. जी-२० सदस्य राष्ट्र म्हणून आफ्रिकन युनियनचे सदस्यत्व भारताच्या पुढाकाराने देण्यात आले आणि त्याचे समर्थनसुद्धा ब्रिक्स मंत्र्यांनी केले आहे.

ब्रिक्स परराष्ट्र मंत्र्यांची ही शिखर बैठक महत्त्वाची आहे. जागतिक अर्थव्यवस्थेतील होत असलेली कोंडी आणि प्रश्न सोडविण्यासाठी सामुदायिक प्रयत्नांच्या दृष्टीने दमदार पावले टाकण्याची गरज आहे. हे लक्षात घेऊन, जी-२० परिषदेत जे मंथन करण्यात आले होते त्यावर अधिक भर देण्यात आला आहे. म्हणजे, भारताच्या पुढाकाराने जी-२० परिषदेत जो निर्णय घेण्यात आला, त्याचा पुररुच्चार मॉस्को निवेदनात करण्यात आला आहे. जगातील युक्रेनचे युद्ध असो किंवा हमास-इस्त्राईल संघर्ष असो, या सर्व ताणतणावांचा विचार करता, शांतता व विकास या गोष्टी आवश्यक आहेत. तेव्हा ब्रिक्स मंत्र्यांनी सर्वसमावेशक संवाद आणि परस्पर सल्लामसलतीने जगापुढचे प्रश्न सुटावेत आणि शांतता प्रस्थापित व्हावी अशी भूमिका त्या निवेदनात घेतली आहे. त्यामुळे समस्यांचे शांततापूर्ण निराकरण करण्याच्या दृष्टीने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. तसेच शांतता व सहकार्यासाठी वचनबद्धता हीसुद्धा सामुदायिक निर्णय प्रक्रियेवर अवलंबून असते ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. मंत्र्यांनी युक्रेनमधील आणि त्यांच्या आसपासच्या परिस्थितीशी संबंधित त्यांच्या राष्ट्रीय भूमिकेचे स्मरण केले. तसेच संयुक्त राष्ट्राच्या परिषदेतील उचित मंचावर आपल्या भावनाही व्यक्त केल्या आहेत. तथापि, परस्पर संवाद आणि मुत्सद्देगिरीद्वारे समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रथमतः योग्य वातावरण निर्मिती झाली पाहिजे व चांगल्या मध्यस्थीसाठी सर्वांनी पुढाकार घेतला पाहिजे, असेही या प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे. तेव्हा ब्रिक्स मंत्र्यांची शिखर परिषद ही सभोवतीच्या ताणलेल्या परिस्थितीत बिघडलेले वातावरण बदलण्यासाठी उपयुक्त ठरली आहे. चिंता गंभीर स्वरूपाची आहे, प्रश्नही बिकट आहे. परंतु, जर सामुदायिक प्रयत्नांची पराकाष्ठा केली, तर गाझापट्टीमधील संघर्ष व हिंसाचार असो किंवा युक्रेनमधील ताणतणाव असो, या बाबतीतसुद्धा प्रश्न सुटू शकतील. जीवित व वित्तहानी तसेच मानवी हक्कांचे उल्लंघन या बाबतीतसुद्धा सर्वांनी मिळून काही नैतिक आचार तत्त्वांचे पालन करावे, असा आग्रह धरण्यात आला हेही तेवढेच महत्त्वाचे आहे.

# जो आज भी करीब हैं...

नाम कोई बोली कोई, लाखों रूप और चेहेरे,
खोलके देखो प्यारकी आंखे, सब तेरे सब मेरे रे...
गंगा आए कहांसे, गंगा जाए कहां रे,
लहेराये पानीमे जैसी धूप-छांव रे!

'सुबहान-अल्लाह, तुम कितना अच्छा गाना गाती...' एका पठाणाच्या तोंडून मिळालेली उत्स्फूर्त दाद ऐकून गंगातीरावर गाणारा परिक्रमावासी विचारतो,

'तुम्हें अच्छा लगा?'

'ओ... भौत अच्छा!'


'इसका मतलब... मेरी तुम्हारी बोलीमें फर्क है, रंगरूप में फर्क है, लेकीन दिलमें प्यार हो तो सब एक हैं... कोई फर्क नहीं!'

'सुबहान-अल्लाह! ओ बाबाजी, तुम कितना बडा बात बोली!'

'काबुलीवाला'(१९६१) चित्रपटातील या गंगेच्या सर्वसमावेशक गाण्यातील गुलजार यांच्या अर्थपूर्ण शब्दांना आणि सलील चौधरी यांच्या सुरावाथ लाभली होती हेमंतकुमारच्या- हेमंतदांच्या- धीरगंभीर आवाजाची. ('जणू मंदिरात कुणी साधू गात आहे असा गंभीर स्वर'... लता! 'हा जणू देवाचाच स्वर!'... सलील चौधरी) इंजिनियरिंग शिक्षण सोडून संगीत-क्षेत्रात प्रवाहित झालेले 'बाबू मोशाय' हेमंतदा बंगाली गाणी भरपूर गायलेच, पण हिंदी चित्रपटसृष्टीत स्थिरावल्यानंतरही मराठी, गुजराती, उडिया, असामी, तमिळ, पंजाबी, भोजपुरी, संस्कृत, उर्दू आदी भाषांना गंगेप्रमाणे सामावून घेत गात राहिले. 'दिलमें प्यार हो तो सब एक है...' संगीत-सुरांची भाषा एकच.

हेमंतदांनी पहिलं बंगाली गाणं (१९४०) सचिनदांच्या संगीत-दिग्दर्शनात गायलं. पहिलं हिंदी गाणं 'मीनाक्षी'(१९४२) चित्रपटासाठी अमरनाथ यांच्या संगीत दिग्दर्शनात गायलं. 'अभियात्री'(१९४७) या चित्रपटापासून भरपूर बंगाली चित्रपटांसाठी संगीत-दिग्दर्शनही केलं. त्यात दिग्दर्शक हेमेन गुप्तांचे चित्रपट होते. हेमेन गुप्तांनी मुंबई चित्रपटसृष्टीत आल्यावर बंकिमचंद्र चटर्जींच्या कादंबरीवर आधारित 'आनंदमठ'(१९५२)च्या संगीत-दिग्दर्शनासाठी हेमंतदांना मुंबईला बोलावून घेतलं. हे हेमंतदांचं हिंदी चित्रपटसृष्टीतलं पहिलं पाऊल. या चित्रपटातील लता आणि हेमंतदांनी गायलेल्या बंकिमचंद्रजींच्या 'वंदेमातरम्...' या अजरामर गीतामुळे आणि १२ व्या शतकातील महाकवी जयदेव यांच्या 'गीत-गोविंद'मधील 'जय जगदीश हरे...' या गीतादत्त-हेमंतदांच्या प्रार्थनेमुळे या आवाजाविषयी आणि संगीताविषयी जबरदस्त कुतूहल निर्माण झालं. या प्रार्थनेतील संस्कृत श्लोकांतील हेमंतदांचा 'धीरगंभीर' आवाज श्रोत्यांच्या मनात कायम घर करून राहिला.

फली मिस्त्री दिग्दर्शित 'सजा'(१९५१) चित्रपटातील 'आ गुपचूप गुपचूप प्यार करें...' या सचिनदांसाठी गायलेल्या गाण्यानंतर, देवआनंदसाठी किशोरकुमार वा रफी हे समीकरणं असताना हेमंतदा,



'ये रात ये चांदनी फिर कहां...' (जाल/१९५२), 'चूप है धरती, चूप है चांद सितारे/ तेरी दुनियामें जीनेसे बेहेतर हैं...' (हाऊस नं.४४/१९५५), 'है अपना दिल तो आवारा...' (सोलवा साल/१९५९), 'याद आ गयीं वो नशीली निगाहें...' (मंझील/१९६०), 'न तुम हमें जानो, न हम तुम्हें जाने...' (बात एक रातकी/१९६४) अशी सचिनदांची सदाबहार गाणी देव आनंदसाठी गात राहिले. 'नागीन'च्या (१९५४) संगीतासाठी हेमंतदांना त्या वर्षीचं फिल्म-फेअर पारितोषिक मिळालं! त्याच वर्षी आलेल्या 'शर्त'मधील त्यांची स्वतःची गाणी, 'देखो, वो चांद छुपके करता है क्या इशारे...' (लता-हेमंत) आणि 'न ये चांद होगा न तारें रहेंगे...' (गीता-हेमंत) या गाण्यांनी लोकप्रियतेचा उच्चांक गाठला... आणि हेमंतदा मुंबईत स्थिरावल्यावर ही स्वरगंगा निरंतर तीन दशकं वहात राहिली!

या स्वर-प्रवाहातील महत्त्वाचे टप्पे जरी पाहिले तरी त्यांच्या कर्तृत्वाची उंची थक्क करते. 'आयेगा आनेवाला...' (महल/१९४९) या खेमचंद प्रकाश यांच्या लताच्या 'गूढ-गर्भी' गाण्यापेक्षा अधिक लोकप्रिय ठरलं हेमंतदांचं 'बीस साल बाद'(१९६२) चित्रपटातील लताचं अजरामर गाणं. तत्पूर्वी आवाजावर विषप्रयोग झाल्यामुळे लता तीन महिने हॉस्पिटलमध्ये होती. पुन्हा गाता येईल यावर तिचाच विश्वास नव्हता. हेमंतदा नियमितपणे हॉस्पिटलमध्ये जाऊन 'लोता, तुम फिरसे गायेगा...' हा विश्वास द्यायचे. त्यानंतर तिनं रेकॉर्ड केलेलं तिचं पहिलं गाणं होतं... 'कहीं दीप जले कहीं दिल...', ज्यासाठी लताला फिल्मफेअर पुरस्कार मिळाला! त्याच प्रकारातील 'झूम झूम ढलती रात...' (कोहरा/१९६४) हे त्यांचं दुसरं गाणं. यावरून त्यांची अशा गाण्यांवरील 'मास्टरी' लक्षात येते. दोन्ही चित्रपटांची निर्मिती त्यांचीच होती. याहून अतिशय वेगळ्या धर्तीची... 'छुप गया कोई रे, दूरसे पुकारके...' (चंपाकली/१९५७) आणि... 'कुछ दिलने कहा, कुछ भी नहीं...' (अनुपमा/१९६६) ही लताची दोन्ही गाणी कमीतकमी वाद्य असलेली, स्वतःशीच संवाद साधणारी. 'साहिब बीबी और गुलाम'मधील (१९६२) 'कोई दूसरे आवाज दे, चले आओ...'/ न जाओ सैंय्या छुडाके बैंया...' ही गीता दत्तची आणि 'भंवरा बडा नादान...' हे आशाचं लाडिक 'सोलो'तर त्याहूनही वेगळं! असा हा विविधस्तरीय प्रवाह.

संगीताच्या स्पर्धात्मक क्षेत्रात एका संगीतकाराने दुसऱ्या संगीतकाराला गायक म्हणून बोलावण्याचा तो सुवर्णकाळ. 'याद किया दिलने कहां हो तुम...' (शंकर-जयकिशन), 'छुपा लो यूं दिलमे प्यार मेरा...' (रोशन), 'जाग-ए-दर्द इश्क जाग...' (सी. रामचंद्र), 'इन्साफकी डगरपे बच्चो दिखाओ चलके...' (नौशाद), 'सूरज रे जलते रहेना...' (लक्ष्मी-प्यारे), 'नींद ना मुझको आए...' (कल्याणजी आनंदजी), 'हे जगतपिता, परमात्मा... (ओ. पी. नय्यर) अशी त्यांची किती तरी इतर संगीतकारांसाठी गायलेली गाणी आहेत. 'जाने वो कैसे लोग थे जिनके...' (प्यासा) हे गाणं तलतनं गावं ही गुरु दत्तची इच्छा. सचिनदा हेमंकुमारसाठी ठाम राहिले. बिमलदांच्या 'दो दूनी चार'चा (१९६८) नायकच किशोर कुमार. त्यातील गुलझारचं 'हवाओंपे लिख दो हवाओंके नाम...' हे गाणं किशोर तब्येतीत गायला. नंतर किशोरकुमारने त्याच्या 'दूर का राही'साठी (१९७०) हेमंतदांकडून, 'मंझीलकी जिसे कुछ भी ना खबर...' हे पार्श्वगीत गाऊन घेतलं! ही आदरभावना महत्वाची.

हॉलीवूड निर्माता-दिग्दर्शक कॉनरॉड रुक्सच्या 'सिद्धार्थ' (१९७२) चित्रपटाला संगीत आणि गाण्याला आवाज देणारे हेमंतदा पहिले भारतीय संगीतकार-गायक होते. 'पद्मश्री' (१९७०) आणि 'पद्मभूषण' (१९८७) हे दोन्ही पुरस्कार योग्य वेळी न मिळाल्यामुळे स्वीकारण्यास त्यांनी सौजन्यपूर्ण नकार दिला होता. १६ जून १९२० रोजी वाराणसी येथे जन्मलेले हेमंतकुमार मुखोपाध्याय, २६ सप्टेंबर १९८९ रोजी स्वर्गवासी झाले. आज कलकत्त्यात 'हेमंत मुखोपाध्याय' नावाचं 'मेट्रो स्टेशन' आहे.

'रवींद्र-संगीताचा' प्रभाव हेमंतदांवर कायमच होता. 'गीतांजली प्रॉडक्शन' ही त्यांची चित्रपट-निर्मिती संस्था. या आठवणींची सुरुवात हेमंतदांनी सलीलदांच्या संगीत-दिग्दर्शनात गायलेल्या गुलझारच्या, 'गंगा आए कहांसे...' गाण्याने झाली. आठवणींच्या अखेरीस संगीत-दिग्दर्शक हेमंतदांचं, त्यांच्याच 'खामोशी'(१९६९) चित्रपटासाठी गुलझारनेच लिहिलेलं, ज्याचं चित्रीकरण गंगेची उपनदी हुगळीवरील 'रवींद्रसेतू' (हावरा ब्रिज)च्या आसपास झालं... ते किशोरकुमारचं अविस्मरणीय गीत,

'वो शाम कुछ अजीब थी, ये शाम भी अजीब हैं,
वो कल भी पासपास थी, वो आज भी करीब हैं!

गायक-संगीतकार हेमंतदांची अविस्मरणीय गाणी... जो आज भी करीब हैं!

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

4

मुंबई, मंगळवार, २५ जून ते ०१ जुलै २०२४

## गुजराती समोसा

**साहित्य सारणासाठी :** एक कप भिजवलेले पोहे, मिक्स भाज्या, बटाटा, गाजर, बीन्स, फ्लॉवर, सिमला मिरची, एक टेबलस्पून तीळ, हिंग, मोहरीची फोडणी, धने-जिरेपूड, आलं, हिरवी मिरची वाटून, लिंबाचा रस, साखर, मीठ, तिखट.

**कृती :** फोडणी बनवा. त्यात आलं, मिरच्या तीळ घाला. वाफवलेल्या भाज्या घाला. पोहे घाला. गार झाल्यावर धने-जिरेपूड, मीठ, साखर, लिंबाचा रस, कोथिंबीर घाला.



**कव्हरसाठी :** दोन कप मैदा, अर्धा चमचा बेकिंग पावडर, मीठ चवीनुसार, अंदाजाने तूप घालून घट्ट भिजवा. नेहमीप्रमाणे सारण भरून समोसे बनवून तळा. तेलात तळा. खजुराच्या चणीबरोबर द्या. त्यासाठी पाव किलो खजूर, शंभर ग्रॅम चिंच, थोडा गुळ, धने-जिरेपूड, तिखट, मीठ सर्व उकळून गाळून घ्या.

## गुलाबपाणी : केसांना सतेज करणारा नैसर्गिक उपाय!

गुलाबाची मोहकता आणि मंद सुगंध नेहमीच आपला मूड तत्काळ रिफ्रेश करायला मदत करतो. पण केवळ बुकेमध्ये किंवा गजरा आणि हारांपुरताच फुलांचा वापर नसतो. गुलाब हे फूल जितके मोहक दिसते तितकेच त्याचे आरोग्यदायी फायदेदेखील आहेत.

**सौंदर्य** खुलवण्यासाठीदेखील गुलाब फायदेशीर ठरते. त्यामधील मॉइश्चरायझिंग घटक, टोनिंग करण्याची क्षमता त्वचेमधील दाह कमी करून त्वचेला सतेज बनवते. गुलाबाचे आरोग्यदायी गुणधर्म, सौंदर्य खुलवण्याची क्षमता यासोबतीने केसांचीही चमक वाढवण्यासाठी फायदा होतो हे तुम्हाला ठाऊक आहे का? म्हणूनच केसांचे आरोग्य जपण्यासाठी ब्युटी एक्स्पर्ट दिलेला हा खास सल्ला नक्की जाणून घ्या.




### गुलाबपाणी कसे ठरते फायदेशीर?

गुलाबाच्या पाकळ्या पाण्यात मिसळून लावल्यास त्वचेला हायड्रेट करतात, पण त्यासोबतच त्वचेला सतेज करण्यास, मॉईश्चराईज्ड करण्यास मदत करतात. मात्र गुलाबाच्या पाकळ्या पाण्यात मिसळून केसांना लावल्यास टाळूवरील अतिरिक्त तेल प्रमाणात राहण्यास मदत होते. सोबतच टाळूवरील pH balance राखण्यास मदत होते. यासोबतच व्हिटॅमिन्स, मिनरल्स आणि ॲण्टीऑक्सिडंट घटक यांचा मुबलक साठा असतो. गुलाबातील इसेन्शियल ऑईल शुष्क त्वचेची समस्या आटोक्यात ठेवण्यास मदत करते. त्यामुळे शाम्पूसोबत त्याचा वापर केल्यास टाळूवरील त्वचा मॉईश्चराईज्ड होण्यास मदत होते तसेच हेअर फोलिकल्स मजबूत होतात.



### फ्रिझी आणि निस्तेज केसांवर कशाप्रकारे वापराल गुलाब पाणी?

**निस्तेज केसांसाठी**

केसांवर कर्लिंग आयर्न किंवा ब्लो ड्रायर वापरत असाल तर केसांचे नुकसान होते. केस अधिक शुष्क होतात. केसांना पुन्हा सतेज करण्यासाठी गुलाबपाणी फायदेशीर ठरते. याकरिता जोजोबा ऑईलमध्ये गुलाबपाणी मिसळा. या मिश्रणाने टाळूवर हलकासा मसाज करा.

मसाज केल्यानंतर सुमारे १० मिनिटांनंतर कोमट पाण्याने केस स्वच्छ धुवावेत. या उपायाने केसांचे नुकसान आटोक्यात ठेवण्यास मदत होते. कर्लिंग आयर्न किंवा ब्लो ड्रायरमुळे केस खराब झाल्यास हा उपचार फायदेशीर ठरतो.

**फ्रिझी हेअर**

फ्रिझी हेअरचा त्रास आटोक्यात ठेवण्यासाठी गुलाबपाण्यासोबत कोरफडीचा गर मिसळा. हे मिश्रण एकत्र करून टाळूवर हलकासा मसाज करा. सुमारे ३० मिनिटांनंतर पाण्याने केस स्वच्छ धुवावेत.

## दररोज जेवणात टाका चिमूटभर हिंग, कधी होणार नाही हे ५ आजार

भारतीय जेवणात स्वाद आणि सुगंध वाढवण्यासाठी हिंगाची फोडणी दिली जाते. हिंगाचा सुवास तेज आणि जेवण्याची इच्छा जागृत करणारा असतो. आयुर्वेदात देखील याचे अनेक फायदे सांगितले गेले आहेत. आपण दररोज चिमूटभर हिंग वापराल तर अनेक आजारांपासून मुक्ती मिळू शकेल. हिंग पोट, लिव्हर आणि डोळ्यासाठी फायदेशीर ठरतो. जाणून घ्या रोज हिंगाचे सेवन केल्याने आरोग्यावर काय प्रभाव पडेल.

**पोटासंबंधी आजार**

हिंग पोटासाठी अत्यंत फायदेशीर आहे. दररोज हिंगाचे सेवन केल्याने पोटासंबंधी समस्या जसे अपचन, गॅस सारख्या समस्या दूर होतात. याने पोटात गॅस, पोटातील किडे, मरोड आणि पोटासंबंधी सर्व वेदनांपासून मुक्ती मिळते.

**बीपीची समस्या**

हिंगात रक्त पातळ करण्याचे गुण असतात. म्हणून हे ब्लड प्रेशरच्या आजाराने त्रस्त लोकांसाठी फायदेशीर आहे. याने नसांमध्ये ब्लड क्लॉटिंग सारखी समस्या होत नाही ज्याने ब्लड प्रेशर अनियंत्रित होण्यापासून मुक्ती मिळते.

**श्वासासंबंधी आजार**

खोकल्याची समस्या असल्यास हिंगाचे सेवन फायदेशीर आहे. हिंग सामान्य खोकला, कोरडा खोकला, इंफ्लूएंजा, ब्रोन्काइटिस आणि दमा सारख्या आजारापासून दूर ठेवतं. डाळ, सांभार आणि भाज्यामध्ये हिंग वापरलं जाऊ शकतं. श्वासासंबंधी आजार असल्यास हिंगात जरासं पाणी मिसळून छातीला लावल्याने आराम मिळतो. याव्यतिरिक्त खोकला आणि दमा सारख्या आजारात आपण हिंगात मध मिसळून सेवन करू शकता.



**मासिक धर्म**

अनेक महिलांना मासिक धर्म दरम्यान वेदना सहन कराव्या लागतात. दररोज हिंगाचे सेवन केल्याने या दरम्यान होणाऱ्या वेदनांपासून मुक्ती मिळते.

हिंग प्रोजेस्ट्रॉन हार्मोन्स उत्पादनात मदत करतं, ज्याने ब्लड फ्लो सुरळीत राहतं. पीरियड्सदरम्यान वेदनापासून मुक्तीसाठी एक ग्लास ताकात २ चिमूट काळं मीठ आणि १ चिमूट हिंग मिसळून प्यावं.

**डोकेदुखी**

हिंगात शरीरातील आंतरिक सूज कमी करण्याची क्षमता असते. साधारणतः डोक्यातील आर्ट्रिजमध्ये सूज असल्यामुळे डोकेदुखीचा त्रास सहन करावा लागतो. अशात रोज हिंगाचे सेवन केल्याने डोकेदुखीपासून मुक्ती मिळू शकते. डोकेदुखीचे प्रमाण अधिक असल्यास एका ग्लासात २ चिमूट हिंग उकळून घ्या. कोमट झाल्यावर दिवसातून दोनदा प्यावे.

## शरीरात युरिक ॲसिडचे प्रमाण वाढले असेल तर या नॅचरल ड्रिंक्सने बॉडीला करा डिटॉक्स

योग्य खानपान आणि औषधांमुळे तुम्ही शरीरात तयार होणाऱ्या युरिक ॲसिडच्या स्तराला नियंत्रित करू शकता. युरिक ॲसिडची अधिकता शरीराला बऱ्याच प्रकारे नुकसान पोहोचवते. आम्ही तुम्हाला अशा काही नॅचरल ड्रिंक्सबद्दल सांगत आहोत ज्याचे सेवन केल्याने शरीरातील युरिक ॲसिडचे स्तर कमी होतील आणि तुम्हाला त्याचा योग्य फायदा देखील मिळेल.



**नारळपाणी**

युरिक ॲसिडच्या स्तराला नियंत्रित करण्याचा सर्वात उत्तम उपाय पाणी आहे. पाण्याशिवाय नारळपाणी देखील युरिक ॲसिडला नियंत्रित करतो. हे युरिक ॲसिडला पातळ करून किडनीला उत्तेजित करतात ज्यामुळे शरीरातून युरिक ॲसिड मूत्राच्या माध्यमाने बाहेर निघून जाते.

**मोसंबी आणि पुदिना**

या ड्रिंकमध्ये पर्याप्त मात्रेत व्हिटॅमिन असतात, जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करण्यास मदत करतात. याचे सेवन करण्यासाठी मोसंबीचे साल काढून त्याच्या बारीक बारीक फोडी करून त्यात लिंबाचा रस आणि पुदिन्याचे पान घालावे व या मिश्रणाला मिक्सरमधून फिरवून त्याचा ज्यूस काढावा व त्याचे सेवन करावे.

**ब्लॅक चेरी आणि चेरी**

ब्लॅक चेरी आणि चेरीचा ज्यूस युरिक ॲसिडमुळे होणारे संधिवात किंवा किडनी स्टोनच्या समस्येसाठी योग्य आहे. ब्लॅक चेरी युरिक ॲसिडच्या सीरम स्तराला कमी करून संधिवात आणि किडनीहून क्रिस्टल दूर करण्यास मदत करते. यात अँटीऑक्सिडेंट आणि अँटी इंफ्लेमेंटरी गुणदेखील असतात, जे युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतात.

**खिऱ्याचे सूप**

खिऱ्याचे सूप शरीराला हायड्रेड ठेवण्यासोबत युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करतो. याचे सेवन करण्यासाठी एका भांड्यात खिऱ्याचा ज्यूस, पाव कप योगर्ट, पुदिन्याचे पान आणि लिंबाचा रस घालून मिक्सरमधून फिरवून घ्या आणि थोड्या वेळाने गार झाल्यावर त्याचे सेवन करा.

**सेबचा सिरका**

सेबचा सिरका शरीरातून युरिक ॲसिडला दूर करण्यास मदत करतो. अँटीऑक्सिडेंट आणि एंटीइंफ्लेमेंटरी गुणांमुळे हे शरीरात क्षारीय ॲसिड संतुलन बनवून ठेवतो. हा सिरका रक्ताच्या पीएच वॉल्यूमला वाढवून युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतो.

**अननसाचा ज्यूस**

या ज्यूसमध्ये व्हिटॅमिन सी सोबत इतर अँटीऑक्सिडेंट असतात जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करून शरीरातून बाहेर काढण्यात मदत करतात. याचे सेवन केल्याने शरीराला दुसरे इतर फायदेदेखील मिळतात.

## नाश्त्यामध्ये ब्रेड, कॉर्नफ्लेक्स खाणे शरीरासाठी हानीकारक

**सकाळच्या** नाश्त्यामध्ये अधिक जणांना ब्रेड, कॉर्नफ्लेक्स आणि अनेक तळलेले पदार्थ खाण्याची सवय असते. मात्र हे पदार्थ फुफ्फुसाच्या कॅन्सरला कारणीभूत ठरत असल्याचे नव्या संशोधनात समोर आलेय. व्हाईट ब्रेड, कॉर्नफ्लेक्स असे ग्लायसेमिक इंडेक्सयुक्त पदार्थ खाल्ल्याने फुफ्फुसाचा कॅन्सर वाढण्याची शक्यता असते. संशोधनादरम्यान ज्यांना हा आजार झाला होता अशा एक हजार ९०५ जणांना समाविष्ट केले होते. त्याचबरोबर दोन हजार ४१३ स्वस्थ व्यक्तींचेही निरीक्षण करण्यात आले. यादरम्यान त्यांच्या आहाराच्या सवयी जाणून घेतल्या. शोधकर्त्यांचे म्हणणे आहे की तंबाखू तसेच धूम्रपान न करणाऱ्या लोकांमध्येही फुफ्फुसाच्या कॅन्सरची लक्षणे आढळली. ज्यावरून त्यांच्या आहाराच्या सवयी या कॅन्सरसाठी कारणीभूत असल्याची शक्यता आहे.



## आला उन्हाळा, हे ध्यानात ठेवा!

▮**उन्हाळा** आल्यावर अनेकदा शरीराला नवीन तापमानाशी जुळवून घेण्यात वेळ लागतो. अशात काही लहान आणि सामान्य गोष्टी असतात ज्यांचा आम्हाला विसर पडत असतो तर त्यांना रिकॉल करायला कुठलीच हरकत नसावी.

▮आता गरज आहे घरातून बाहेर निघताना सनस्क्रीन लोशन लावण्याची आणि स्कीन झाकून निघण्याची. सोबत पाण्याची बॉटल किंवा ग्लुकोज असणे उत्तम. कॉटनचे हलक्या रंगाचे कपडे परिधान करणे योग्य ठरेल.

▮आहार बदल सर्वात महत्त्वाचे पाऊल आहे. म्हणून आता मसालेदार, स्पाईसी, तळकट खाणे टाळा. लिक्विड डाइट अधिक घ्या. घरातून बाहेर पडण्यापूर्वी लिंबू पाणी, ताक किंवा फ्रूट ज्यूसचे सेवन करणे विसरू नका.

▮उन्हाळ्यातील फळं कलिंगड, काकडी, खरबूज, द्राक्ष, संत्री, स्ट्रॉबेरी, नारळ पाणी, आंबा आपल्या आहारात सामील करा.

▮उन्हाळ्यात रॉक साल्ट, जिरं, बडीशेफ आणि वेलची सारखे मसाले वापरून दही, कैरीचं पना, पुदिना, थंडाई, सातू हे सेवन करणे शरीरासाठी अनुकूल ठरेल.

▮अति तापमान असल्यास शक्यतो ११ ते ४ यादरम्यान घरातून, ऑफिसमधून बाहेर पडणे टाळावे.



## केसगळती रोखणारा 'वन मिनिट' उपाय!

केसगळती ही काही प्रमाणात प्रत्येकामध्ये आढळून येते. केसगळतीचे प्रमाण दिवसाला १०० पेक्षा अधिक असल्यास ती समस्या गंभीर आहे. या समस्येचे एक कारण म्हणजे टाळूला होणारा अपुरा रक्तप्रवाह! मग त्यावरचा एक उपाय म्हणजे टाळूला मसाज करा.



**केस** धुतल्यानंतर बोटांनी टाळूला मसाज करणे हा केसगळती रोखण्याचा एक सहज-सोपा घरगुती उपाय आहे. मग केसगळती रोखण्यासाठी जरूर टाळा या चुका!

**कसे आहे फायदेशीर?**

डॉ. एच. के. भाकरू यांच्या 'होम रेमेडीज फॉर कॉमन इएलमेंट्स' या पुस्तकात लिहिल्यानुसार थंड पाण्याने केस धुतल्यानंतर टाळूवर हातांच्या बोटांनी मसाज करावा. यामुळे डोक्याजवळील रक्तवाहिन्यांना चालना मिळाल्याने रक्तप्रवाह सुधारतो. परिणामी केसांची वाढदेखील सुधारते.



**तुम्ही काय कराल ?**

तुमच्या सोयीनुसार पाण्याचे तापमान, शाम्पूने केस धुवा. मात्र शेवटी ते कोमट किंवा साध्या पाण्याने धुवून निथळत ठेवा. यामुळे केस गुंतण्याची शक्यता कमी होते. केसांचे गुंतणे रोखण्यासाठी करून पहा हे उपाय.

काही वेळाने केस टॉवेलने पुसा आणि कोरडे करा. त्यानंतर हाताच्या बोटांनी गोलाकार दिशेने मसाज करा.

**खबरदारीचा उपाय**

मसाज करताना तो हळूवार आणि समान प्रमाणात असावा. खूप जोरजोरात केस घासणे, मसाज करताना नखांचा वापर करणे टाळा. यामुळे केसांचे नुकसान होऊ शकते.

## सायीचा उपयोग रंग उजळण्यासाठी करावा

▮ मुलतानी माती बारीक करून सायीत मिसळून चेहऱ्यावर तसेच कोपरावर लावल्यास रंग उजळतो.

▮ तीन चार बदाम आणि दहा बारा देशी गुलाबाच्या पाकळ्या वाटून त्यात एक चमचा साय मिसळून ते मिश्रण चेहऱ्यावर लावल्यास चेहऱ्यावरच्या सुरकुत्या आणि काळे डाग नाहीसे होतात.

▮ सायीत समुद्र फेसची बारीक पावडर मिळवून लावल्यास चेहऱ्यावरची मुरमे बरी होतात.



▮ मोसंबी किंवा संत्र्याची सालं वाटून त्यात साय मिसळून त्याचा लेप लावल्यास त्वचा मुलायम व स्वच्छ होते.

▮ एक चमचा साय व एक चमचा सफरचंदाचा रस एकत्र करून फेटून हलक्या हाताने चेहऱ्यावर मालीश केल्यास चेहऱ्याचा रंग उजळतो.

▮ सायीचा उपयोग औषधासारखाही होतो.

## दही कधी खावे?

**संपूर्ण** वर्षभरामध्ये ज्या ऋतूमध्ये दही अगदी निषिद्ध समजले पाहिजे, असा ऋतू म्हणजे वसंत. वसंत म्हणजे थंडीनंतर येणारा उन्हाळा, सध्या सुरू असलेले दिवस. वसंत ऋतूमधील कफ प्रकोपाचा विचार करता पाळावयाचा नियम म्हणजे दही वर्ज्य करणे. शरीरामध्ये कफ वाढवणारे दही वसंत ऋतूमध्ये सेवन करण्याचा निषेध शास्त्राने केला हे स्वाभाविकच आहे. वसंत ऋतूमधील दह्याचे काही विशिष्ट गुणदोष असतात. ते दही गोड व आंबट चवीचे असते. गोड व आंबट हे दोन्ही रस वसंतामध्ये टाळणे अपेक्षित आहे. ते शरीरामध्ये स्निग्धत्व वाढवणारे असते. वसंत ऋतूमध्ये स्निग्धत्व वाढवणारा आहार टाळायचा असतो. याशिवाय वसंतातल्या दह्याचा अजून एक दोष म्हणजे ते वातल (वात वाढवणारे) असते. त्यामुळे वात प्रकृतीच्या व्यक्तींना, वातविकाराने त्रस्त लोकांना ते योग्य नाहीच.

याशिवाय दही हे अभिष्यन्दी आहे, म्हणजे स्राव वाढवणारे आहे, ज्या दोषामुळे शरीरामध्ये पाणी वाढते. वसंत ऋतूमध्ये आधीच कफ पातळ झाल्यामुळे शरीरामध्ये स्राव, पाणी वाढलेले असताना दह्याचा शास्त्राने निषेध केलेला आहे. दही हे सूज सुद्धा वाढवते, अर्थात अतिप्रमाणात व अवेळी सेवन केले तर. दह्याबाबत वसंत ऋतू ही अवेळ आहे. वसंतामध्ये कफाचा जोर असताना सांधे हे कफाचे स्थान असल्याने सांध्यामधल्या श्लेष्मल त्वचेला सूज येण्याची व त्या श्लेष्मल त्वचेमधून स्राव वाढण्याची शक्यता बळावते. म्हणूनच सूज व स्राव वाढवणाऱ्या दह्याचा त्याग या दिवसांमध्ये करायचा आहे. अर्थात जिथे-जिथे स्राव स्रवतात, ते स्राव वाढवण्याचा, जिथे-जिथे सूज आहे तिथे सूज वाढवण्याचा धोका वसंतामध्ये दही खाल्ल्याने बळावतो.

या दिवसांमध्ये उन्हाळा सुरू झाला म्हणून दह्याचे सेवन सुरू केल्यानंतर विविध कफविकार, उष्णतेचे विविध रोग आणि सूजसंबंधित विकृती झाल्याचे अनुभव दरवर्षी अनुभवायला मिळतात.

उपचाराला दही न खाण्याची जोड दिली तरच हे आजार बरे होतात. केवळ औषधोपचारानंतर आजाराची लक्षणे कमी होतात; पण तात्पुरती; दही खाणे थांबवल्यानंतर मात्र या रुग्णांना आराम मिळालेला दिसतो.



## ऐन कामाच्या वेळी फोन नेटवर्कने धोका दिला? बदला ही सेटिंग, खराब नेटवर्कमध्येही करता येईल कॉल

फोनमध्ये खराब नेटवर्क असल्यास कॉल करताना खूप त्रास होतो. महत्त्वाची कामंसुद्धा यामुळे रखडू शकतात. तुम्हालाही दररोज या समस्येचा सामना करावा लागत असेल, तर वाय-फाय कॉलिंग तुमची मदत करेल. या ट्रिकच्या मदतीने तुम्ही खराब नेटवर्कमध्येही स्पष्ट व्हॉइस कॉल करू शकाल. ही खास युक्ती ॲंड्रॉइड तसेच आयफोन युजर्ससाठी आहे. वाय-फाय कॉलिंगसाठी तुम्हाला वाय-फायमध्ये प्रवेश आवश्यक आहे. यानंतर फोनचे नेटवर्क खराब असले तरीही तुम्ही आरामात कॉल करू शकाल. ॲंड्रॉइड स्मार्टफोनवर वाय-फाय कॉलिंग कसे सुरू करावे ते पाहा.

**गुगल पिक्सेल डिव्हाइसेस**

सर्वात आधी फोनच्या सेटिंगमध्ये जा. नेटवर्क आणि इंटरनेट पर्यायावर टॅप करा नंतर कॉल आणि एसएमएस पर्यायावर जा. वाय-फाय कॉलिंग पर्याय शोधा आणि उघडा. वाय-फाय कॉलिंग वापरण्यासाठी टॉगल चालू करा.

**वन प्लस युजर्स**

फोनच्या सेटिंगजमध्ये दिलेल्या मोबाइल नेटवर्क पर्यायावर जाऊन सिम १ वर टॅप करा. नंतर वाय-फाय कॉलिंगचा पर्याय शोधा आणि उघडा. वाय-फाय कॉलिंग चालू करा. येथे तुम्ही उपलब्ध नेटवर्कमध्ये वाय-फाय आणि सेल्युलर कॉलिंगचे प्राधान्य देखील सेट करू शकता.



**आयफोनवर वाय-फाय कॉलिंग कसे सक्रिय करावे?**

सर्वप्रथम सेटिंगमध्ये दिलेल्या फोन ऑप्शनवर जा. नंतर वाय-फाय कॉलिंग पर्यायावर टॅप करा. वाय-फाय कॉलिंग चालू करण्यासाठी टॉगल चालू करा. जर वाय-फाय कॉलिंग सेवा उपलब्ध असेल, तर तुम्हाला स्क्रीनवर ऑपरेटरच्या नावापुढे वाय-फाय दिसेल.

**सॅमसंग आणि बहुतेक ॲंड्रॉइड डिव्हाइसेस**

प्रथम फोन ॲप उघडा. नंतर वरच्या उजव्या बाजूला दिलेल्या थ्री डॉट्सवर टॅप करा. सेटिंग्ज उघडण्यासाठी टॅप करा. येथे तुम्हाला वाय-फाय कॉलिंगचा पर्याय दिसेल. ते उघडा आणि टॉगल चालू करा.

## बर्फाच्या पाण्याचे सेवन करत असाल तर सावधान!

**उन्हाळ्यात** तहान भागवण्यासाठी आपण सगळेच थंड पाणी पितो अथवा बर्फ टाकून पाणी पितो, मात्र अधिक थंड पाणी प्यायल्यामुळे पचनास त्रास होतो. यामुळे आरोग्याशी संबंधित अनेक समस्या निर्माण होतात.

▮थंड पाण्यामुळे नसा आखडतात. यामुळे पचनाची क्रिया संथ होते आणि बद्धकोष्ठता, गॅस यासारख्या समस्या निर्माण होतात.

▮उन्हाळ्यात बाहेरचे तापमान अधिक असते. यात थंड पाणी प्यायल्यास छातीत कफ जमा होऊ लागतो. थंड पाणी प्यायल्यानंतर शरीराचे तापमान मेंटेन करण्यासाठी शरीराला मोठ्या प्रमाणात एनर्जी खर्च करावी लागते. याचा परिणाम पचन संस्थेवर होतो.



▮थंड पाण्यामुळे नसा संकुचित होतात. यामुळे हृदयाला ब्लड पंप करण्यासाठी जास्त मेहनत करावी लागते. यामुळे हार्ट बीट संथगतीने होतात.

▮थंड पाणी प्यायल्याने प्रतिकारक क्षमता कमी होते. यामुळे ॲलर्जी तसेच आजारांची भीती वाटते.

▮थंड पाणी प्यायल्याने शरीराचे तापमान अचानक बदलते. ज्याचा परिणाम डोकेदुखीसारख्या समस्या उद्भवतात.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ्र श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ्र गाळा नं. ४, एन.के.इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ्र श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणा-या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID : policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE – UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At – 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist – Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor – Mr. Dr. Deepak MoreshwarNaik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com